दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2019-2021
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम

रविवार पुरवणी २७ ऑक्टोबर २०२४

# "पक्षीय तिकीटांचा संघर्ष आणि मतदाराच्या अपेक्षा "

संपादकीय

**राजकारणात निवडणुका येतात तेव्हा सत्तेच्या उन्मेषात उमेदवारांसाठी पक्षाची तिकीट मिळविण्याची स्पर्धा जोरात असते. मात्र, काही उमेदवारांना त्यांचे इच्छित मतदारसंघ मिळत नाहीत, किंवा पक्षाने त्यांना तिकीट नाकारल्यास, ते अपक्ष किंवा दुसऱ्या पक्षात प्रवेश करत निवडणुकीच्या रिंगणात उतरतात. ही परंपरा आता व्यापक बनली आहे, आणि त्यामुळे मतदारसंघातील मते फुटण्याची शक्यता निर्माण होते. जनतेचा प्रतिनिधी निवडण्यासाठी निवडणुकीत लोकशाहीचा उपयोग करावा लागतो, मात्र उमेदवारांची ही भूमिका लोकांच्या सेवेसाठी असली पाहिजे हे विसरले जाते.**

### जनसेवा की पक्षीय तिकीटाची महत्त्वाकांक्षा ?

आज राजकीय परिपेक्ष्य लक्षात घेतल्यास, तिकीट मिळणे ही उमेदवारांसाठी प्रतिष्ठेची बाब बनली आहे. जो उमेदवार जनतेसाठी कार्य करण्याच्या इच्छेने राजकारणात आला आहे, त्याने तिकीट न मिळाल्यासही लोकांच्या सेवेत काम करणे सुरू ठेवावे. जनतेने देखील हे लक्षात ठेवले पाहिजे की, लोकप्रतिनिधी बनणे ही केवळ पदाची आकांक्षा नसून, जनसेवेसाठी असलेली आस्था असावी लागते.

### अपक्ष निवडणुकीत उतरल्याने मतविभाजनाचे संकट

तिकीट न मिळाल्यामुळे अपक्ष म्हणून निवडणुकीत उतरणाऱ्या उमेदवारांमुळे मतविभाजन होते आणि अखेरीस लोकांची एकता व मतदान शक्ती कमकुवत होते. अपक्ष निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना विचार करण्याची गरज आहे की, जर तुम्ही लोकसेवेसाठी खरोखरच कार्यरत असाल, तर पक्षाच तिकीट मिळणे, निवडणूक जिंकणे ही गोष्ट दुय्यम असावी.

### कामगिरीतून पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना विश्वास मिळवणे

एका चांगल्या उमेदवाराने जनतेसाठी कार्य करताना पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना त्याच्या कार्यक्षमतेवर विश्वास बसावा अशी भूमिका घेणे आवश्यक आहे. जर त्या उमेदवाराच्या कार्यात प्रामाणिकता, जनसेवा आणि लोकहिताचा विचार असेल तर पक्षाने त्याला नक्कीच तिकीट दिले पाहिजे.

### पक्ष बदलणे आणि राजकीय निष्ठा

आजची समस्या अशी आहे की, काही राजकारणी पक्ष बदलतात, आणि त्यांच्या निष्ठेचे विषय मिटून जातात. राजकीय कार्यकर्त्यांनी पक्षाची निष्ठा कायम ठेवली पाहिजे पक्ष बदलणे हे केवळ आपल्या स्वार्थासाठी किंवा पदासाठी असते. राजकीय व्यक्तींनी यामध्ये कार्यकर्त्यांचा, मतदारांचा विचार करणे आवश्यक आहे, आजचा हा नेता मतदार राजाच्या विचारामुळे बनलेला आहे याची जाणीव राजकीय नेत्याने ठेवावी.

### समाजासाठी मांडण्याचे ,सुधारण्याचे खरे मुद्दे अनेक आहेत

शाळा, शिक्षण, आरोग्य, क्रीडा, युवा कौशल्यविकास, महिला सक्षमीकरण यांसारखे अनेक समाजउपयोगी खरे मुद्दे अनेक आहेत. त्यामध्ये अनेक त्रुटी आहेत. गावागावातील शाळा, त्यामधील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी धडपडणे, यांसारखी अनेक कामे आहेत. अशा अनेक समस्यांनी मतदारराजा म्हणजेच सामान्य माणूस गांजलेला आहे. नेत्यांच्या हातात पक्षीय ताकद असल्यामुळे त्यांना कोणतेही काम तडीस नेण्यास अडचण येऊ शकत नाही. त्यामुळे समाजासाठीच्या सगळ्या सुविधा जो नेता चांगल्या पद्धतीने देईल त्याला उमेदवारी देणे हि त्या पक्षाची गरज असेल असे काम नेत्यांनी करावे अशी समाजाची अपेक्षा आहे.

### आरोग्य व्यवस्था, सरकारी रुग्णालये आणि त्यांच्या सुधारणा

जनतेच्या हितासाठी राजकीय मंडळींनी सरकारी रुग्णालये आणि त्यात आवश्यक सुधारणा करणे हा एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा आहे. भारताच्या आरोग्य व्यवस्थेत सरकारी रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रे (PHC) एक महत्त्वाची भूमिका बजावतात. मात्र, अनेक ठिकाणी सरकारी आरोग्य केंद्रांची स्थिती सुधारण्याची गरज आहे.

आजही, गरिबांपासून उच्च वर्गातील अनेक लोकांना दर्जेदार उपचार मिळण्याची अपेक्षा फक्त खाजगी रुग्णालयांमधून असते. यामुळे सर्व स्तरातील लोक सरकारी रुग्णालयांचा वापर अधिक प्रमाणात करावा, असे वातावरण निर्माण करण्याची गरज आहे. सरकारी रुग्णालयातील कर्मचाऱ्यांची अडचण, अपुरी साधने, औषध पुरवठा यांच्या बाबतीत व्यापक सुधारणा करायला हवी.

### सर्वांसाठी सहज उपलब्ध सुविधा

सरकारी रुग्णालयांचे प्रत्येक नागरिकाला तातडीच्या व आवश्यक सेवा पुरवणे हे उद्दिष्ट आहे. पण प्रत्यक्षात, सरकारी रुग्णालयांमध्ये अपुरी साधने, औषधांचा तुटवडा, आणि तज्ञ डॉक्टर व कर्मचाऱ्यांचा अभाव दिसून येतो. जर सर्व स्तरातील लोक, म्हणजेच उच्चवर्गीय, मध्यमवर्गीय व अल्पभूधारक वर्गाने या सुविधा वापरल्या, तर यंत्रणेमध्ये व्यापक सुधारणा घडवून आणण्यासाठी सरकारवर दडपण येईल. त्यामुळे सरकारी रुग्णालयांचे आधुनिकीकरण होऊ शकेल व त्यामधील सेवा अधिक सक्षम होईल.

### प्राथमिक आरोग्य केंद्रांना (PHC) अधिक सक्षम बनवणे

ग्रामीण व दुर्गम भागातील जनतेसाठी प्राथमिक आरोग्य केंद्रे हे पहिल्या संपर्काचे केंद्र ठरतात. जर PHC केंद्रांमध्ये अत्याधुनिक साधने, नियमित औषध पुरवठा, अनुभवी डॉक्टर आणि प्रशिक्षित कर्मचारी असतील, तर गावांतील लोकांना शहरी भागात जाण्याची गरज भासणार नाही. यातून वेळ, पैसा, व श्रम वाचतील आणि लोकांना त्यांच्या जवळच्याच ठिकाणी उपचार मिळतील.

सरकारी रुग्णालयांत औषधांचा सातत्याने तुटवडा जाणवतो. हे औषध साठा वेळेवर व मुबलक उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. याचबरोबर, त्याठिकाणी काम करणाऱ्या डॉक्टर, नर्स, व इतर कर्मचाऱ्यांची संख्या वाढवणे, त्यांना उत्तम प्रशिक्षण देणे, आणि कामाच्या योग्य शिफ्ट्स पुरवणे, ही सुधारणा तातडीने होण्याची गरज आहे. हे केल्यास, रुग्णसेवा जलद आणि प्रभावी होऊ शकेल.

### उच्चवर्गीय व खाजगी रुग्णालयांना पर्याय

सरकारी रुग्णालयांना सक्षम बनवले तर उच्चवर्गीय नागरिक सुद्धा सरकारी रुग्णालयांचा वापर करतील. अनेक देशांत सरकारी रुग्णालये ही खाजगी रुग्णालयांना एक सशक्त पर्याय म्हणून ओळखली जातात. जर भारतात सरकारी रुग्णालयांमध्ये दर्जेदार सेवा मिळाली, तर लोकांना खाजगी रुग्णालयांवर अवलंबून राहण्याची गरज भासणार नाही. यातून खाजगी रुग्णालयांची मक्तेदारी कमी होईल आणि सर्व नागरिकांना किफायतशीर उपचार उपलब्ध होतील.


आरोग्य,शिक्षण ही प्रत्येक नागरिकाची मुलभूत गरज आहे आणि सरकारने यासाठी आवश्यक सेवा पुरवणे ही त्यांची जबाबदारी आहे. प्रत्येक वर्गातील नागरिकांनी सरकारी आरोग्य सेवा निवडल्या तर सरकारला यामध्ये अधिक संसाधने गुंतवण्याची व वचनबद्धता वाढवण्याची प्रेरणा मिळेल आणि यासाठी त्या त्या भागातील नेत्यांनी जातीने लक्ष घालून सुधारणा करावी अशी मतदाराची अपेक्षा आहे.

जो राजकारणी जनतेच्या भल्यासाठी, त्यांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी झटत असेल, त्याची प्रतिमा लोकांमध्ये सकारात्मक असेल, आणि त्याला पक्षाने नक्कीच तिकिट द्यावे अशी जनतेची मागणी असेल. राजकारण्यांनी आपले कार्य सतत जनहितासाठी वापरावे, पदाच्या मागे लागण्याऐवजी पद आपल्या मागे लागले पाहिजे, अशी जनसेवेची भावना प्रत्येक उमेदवाराने मनात ठेवायला हवी.

कोकणात जिल्हापरिषदेच्या,नगरपरिषदेचा शाळातील मुले क्रीडा प्रकार उत्तम खेळतात.धावणे,तिरंदाजी,खो खो,उंच उडी,थाळीफेक,भालाफेक यासारखे विविध खेळ हि मुले लीलया खेळत असतात.यातून नीरज चोपडा, इत्यादी सारखे खेळाडू बनण्याची या मुलांची क्षमता आहे. या शाळांतील मुलांना शोधून देशासाठी पदक आणण्यास साथ देणे,त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना मार्गदर्शन करणे हे काम आहे आणि या कामाची अपेक्षा मतदारराजा, कार्यकर्ता करतो आहे.

लोकांनी देखील हे लक्षात घ्यायला हवे की, आपला प्रतिनिधी निवडताना आपल्या भागात काय महत्वाच्या सुधारणा हव्या आहेत ज्याने येणारी पिढी सक्षम होऊ शकेल याचा विचार करावा. सुशोभीकरण वगैरे सारख्या दुय्यम गोष्टी महतवाच्या मानू नयेत जनसेवेची निष्ठा असलेला, आणि जनहितासाठी काम करणारा उमेदवार निवडावा.

# गर्जतोही.... पडतोही!!



## मनाच्या हिंदोळ्यावर



बाबू घाडीगांवकर,
त्रिंबक, ता.मालवण.
मो. ९४२१७९५९५५.



दरवर्षी आश्विन महिन्यात परतीच्या पावसाचा अनुभव घेतलेल्या आम्ही असे अनेक पावसाळे पाहिले आहेत. आमची म्हातारी आये तर अशा परतीच्या पावसाला 'नासपती'च म्हणायची. पावसाळ्याच्या सुरुवातीस पडणारा आणि पावसाळ्याच्या शेवटी पडणारा असा 'नासपती' पाऊस थोडाफार तरी 'धुरळा' उडवून जातोच. शेतीची, घरांची, आणि जिवितहानीही करून जातो. अगदी भातकापणीच्या दिवसांत असा परतीचा पाऊस दरवर्षी जोर करतोच.

भातलावणीच्या काळात एकेक कुणगा लावताना धांदल, धावपळ उडते. एखादी मोठी पावसाची सर आली की तिच्या पाण्यावर शक्य तेवढ्या लगबगीने लावणीसाठी चिखल करावा लागतो. पुढे दसऱ्यानंतर भातशेती पिकून तयार होते. नेमक्या याच दिवसांत परतीच्या पावसाचा खेळ सुरु होतो. एकदा हा परतीचा पाऊस सुरु झाला की पुढचे चार पाच दिवस तो लागतो. दुपारनंतर अचानक आभाळ उगवतीकडून काळ्याकुट्ट ढगांनी भरून जाते. विजांचा चमचमाट, ढगांचा गडगडाट सुरु होतो. जोराचा वारा सुटतो. वाऱ्याच्या वाढत्या वेगासोबत ढगांचा गडगडाटही वाढत जातो. अशा गडगडाटाला म्हातारी आये 'घुडूम म्हातारी' म्हणायची. अशी घुडूम म्हातारी आभाळात चणे 'भरडायला' लागली की कुणग्यांत, परड्यात सोडलेली वासरे वाट दिसेल तिकडूम ठोकायची. त्यांच्या पाठून कोणी धावायचे, त्यांना कोणी 'काणी' बांधायची यावरून घरात हीड भांडणे व्हायची. सकाळपासून कापून, पसरून टाकलेले भात गोळा करणे, 'पेंडका' बांधणे आणि ती पेंडका डोक्यावरून पटपट आणून मांगरात टाकताना माणसांची तारांबळ उडायची.

आभाळ अधिक काळेकुट्ट झाले, विजांचा तडाखा वाढला की मग पाऊस कोसळू लागायचा. तसा हा पाऊस जेमतेम अर्धा तासच पडायचा, पण तेवढ्या पावसाने कुणग्यांत पाणी साचायचे, भात झोडणीसाठी सारवलेल्या खळ्यात चिखल व्हायचा. मात्र पुढच्या तासाभरात वातावरण निवळून जायचे. पाऊस, वारा, विजा, ढगांचा गडगडाट सारे थांबायचे. तासाभरानंतर परत पिवळे, कोवळे ऊन पडायचे. एखाद्या नवख्या माणसाला वाटावे, अरे इथे तर चांगलेच ऊन पडलेय तर मग जमीन भिजली कशाने बरे? अशा पावसाची दरवर्षी सवयच झाल्याने असा एखाद्या दिवशीचा पाऊस ओसरल्यावर बाबा सांगायचा," गर्जेल तो पडेल काय?" जेवढ्या जोरात ढगांचा गडगडाट व्हावा, विजा चमकाव्यात, आता पुढच्याच क्षणाला मोठा 'प्रलय' येतो की काय असे वाटावे आणि प्रत्यक्षात मात्र पावसाने अर्ध्या तासातच पळ काढावा किंवा शरणागत व्हावे असाच या म्हणीचा शब्दशः अर्थ असावा. पण यंदाचा परतीचा पाऊस काही निराळेच ठरवून आला आहे असे वाटू लागले आहे.

दरवर्षी जेमतेम चार पाच दिवसांपुरता दुपारनंतर पडणारा पाऊस, आता पंधरवडाभर उलटून गेला तरी रात्रंदिवस खुळावल्यागत पडत आहे. दररोज दुपारी असा ढगांचा गडगडाट, विजांचा चमचमाट सुरु होतो आणि मग पाऊस अक्षरशः कोसळू लागतो. बरे, असा पाऊस अर्धा पाऊण तास कोसळला आणि मग आकाश निवळले असे होत नाही. दुपारनंतर सुरु झालेला पाऊस दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत संततधार लागावी तसा पडत राहतो. 'गर्जेल तो पडेल काय?' ही म्हण तर त्याने यंदा तरी सपशेल खोटी ठरविली आहे. सध्याचा पाऊस हा परतीचा असला तरी गर्जतोही, अन पडतोही!

गेल्या काही वर्षांपासून बदललेल्या अशा ऋतुचक्राचा अभ्यास करताना अनेकांच्या डोक्याचा असा 'भुगा' झाला आहे. आता पिकून कापणीसाठी तयार झालेली भात शेती, नाचणी, वरी, कुळीथ, उडीद, भुईमूग वगैरे काढावा, कापावा की न कापावा अशी भयंकर वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. काही दिवसांपूर्वी आटलेले ओहोळ, मळे आता पावसाच्या पाण्याने तुडुंब भरून परत वाहू लागले आहेत. पिकलेली भातशेती आडवी, जमीनदोस्त, भुईसपाट झाली आहे. नाचणीच्या शेतांचीही अवस्था वेगळी नाही. आधीच सध्या कोणी शेती करण्यात रस घेत नाहीत. अनेकांनी शेती करणे सोडून दिले आहे, गुरेढोरे विकून टाकली आहेत. मात्र तरीही काही हौशी शेतकरी आपल्या मातीशी, शेताशी इमान राखून शेती करतात. शेती करताना अनेक अडचणींवर मात करतात. मात्र पिकून तयार झालेल्या शेतीची अशी डोळ्यांदेखत नासाडी होत असेल तर यापुढच्या काळात गावात राहून शेती करण्याचा धोका कोणी पत्करील असे वाटत नाही.

---

# स्काऊट म्हणजे चैतन्य

## या लाडक्या मुलांनो



प्रवीण कुबल, मुख्याध्यापक,
शाळा शिडवणे नं. १
ता. कणकवली.

स्काऊट म्हणजे चैतन्य. शाळेत हे चैतन्य आणण्याचे महत्त्वाचे काम शिक्षकच करत असतात. शिक्षक शाळेत येतात तेव्हा चैतन्याच्या लहरी शाळेत दाखल होत असतात. स्काऊट , गाईड , कब आणि बुलबुल चं एक दिवसीय उजळणी ट्रेनिंग नुकतंच पार पडलं .

ठिकाण होतं देवगड तालुक्यातील शिरगांव हायस्कुल. माझी या शाळेत दोन ते तीन प्रशिक्षणं झाली होती. एकदा मी मास्टर ट्रेनर सुद्धा होतो. देवगड तालुक्यात काम करताना आलेले अनेक शैक्षणिक अनुभव शेअर करताना आज माझ्या काही जुन्या आठवणींना पुन्हा उजाळा मिळाला.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात नोकरी करताना पहिल्यांदा देवगड तालुक्यात शैक्षणिक कार्य करण्याचं भाग्य लाभलं. दोन शाळांमध्ये काम करताना दोन्ही ठिकाणी मिळालेले अनुभव मला स्वतःला सतत अद्ययावत करणारे होते. आंब्याच्या दिवसांत तिथल्या मोहोराचा सुगंधी वास नाकात भरुन राहिलेला आहे. तो गंध पुन्हा नाकात आला कि जीवनाचं सार्थक होऊन जातं. स्वच्छ , शुद्ध श्वास घेतल्याचा आनंद मिळतो. माझ्यावर आलेल्या अनाहूत संकटामुळे मला देवगड सोडावं लागलं. त्यामुळे मी देवगडला पारखा झालो. पुन्हा आज एक दिवसासाठी प्रशिक्षण स्थळी गेल्यामुळे पुन्हा सगळ्या पूर्वीच्या आठवणी माझ्या मनचक्षू समोर फेर धरुन नाचू लागल्या.

मी कबमास्टर म्हणून प्रशिक्षण द्यायला पुढे सरसावलो. माझ्यातील कबमास्टर पुन्हा सर्व शिक्षकांशी संवाद साधू लागला होता. मी वर्गात जसं शिकवतो, अगदी जसाच्या तसाच शिक्षकांना ट्रेनिंग देऊ लागलो होतो. मी माझं पूर्ण कौशल्य पणाला लावलं होतं. हल्लीच अनेक शाळांमधून नवनियुक्त शिक्षक नियुक्त केले गेले आहेत. जुन्या शिक्षकांकडून त्यांना चांगले संदेश मिळणं अतिशय गरजेचं आहे. त्यांच्यामध्ये मला माझा पूर्वीचा मी दिसत होता. मी नवीन नियुक्त झालो असताना उत्साह ओसंडून वाहत होता. नवनवीन ज्ञान घेऊन नित्यनूतन टवटवीत बनण्याचा ध्यास मला लागलेला होता. तो ध्यास मी अजूनही तसाच जपून ठेवला आहे. मला दररोज काहीतरी चांगलं नवीन शिकायला मिळावं हे मी ठरवलेलं असतं. त्यामुळे नवीन आणि जुन्या शिक्षकां- समोर मी मला मोकळं केलं. त्यांनी माझ्यातलं चैतन्य पाहून त्यांच्यातलं चैतन्य जागृत झालं असावं. त्यांनी दिलेला प्रतिसाद खरंच दाद देण्यासारखा होता. मी त्यांना भौतिकशास्त्र विषयातील ' ट्युनिंग फॉर्क ' चं उदाहरण दिलं. हा ट्युनिंग फॉर्क रबरी टायरच्या तुकड्यावर आपटल्यानंतर ' कंप ' पावत असे. त्यातील ऊर्जा तात्पुरती असे . कंप होणं थांबलं कि त्याच्यातील ऊर्जा शून्य होत असे. मीही तसंच करत होतो. या नव्या जुन्या शिक्षकांमध्ये तात्पुरतं चैतन्य निर्माण करत होतो. हे चैतन्य टिकवून ठेवणं हे सर्वस्वी त्यांच्याकडेच होतं. त्यांनी या ज्ञानाचा वापर प्रत्यक्ष मुलांसाठी करावा एवढीच माफक अपेक्षा आम्ही नेहमी करत असतो. असो. सुजाण शिक्षक नक्कीच आपली ज्ञानाची ज्योत नित्य तेवत ठेवत राहतील याबद्दल मला अजिबात शंका नाही. आपण शिक्षक म्हणून अनेक उत्तम उपक्रम शाळेत राबवत असतो. या उपक्रमांना ' स्काऊट , गाईड , कब आणि बुलबुल ' या संकल्पनेचा स्पर्श केलात कि झालं.

स्काऊट हा आता आपल्या अभ्यासक्रमातीलच विषय आहे. आठवड्यातून एकदा किंवा दोनदा याच्या तासिका घेताना ' निसर्गाच्या सानिध्यात ' घ्यायला हवी. कारण स्काऊटींग हे एक आऊटींग आहे. मुलांना निसर्गातील आल्हाददायक वातावरणात शिकायलाही खूप आनंददायक वाटतं. कारण निसर्ग म्हणजे बिनभिंतींची शाळा असते. तिला खिडक्या नसतात. मुले नेहमी शिकवत असताना वर्गाच्या बाहेर बघत असताना दिसतात. निसर्गाला खिडक्या नाहीत कि दारे !!! मुले त्यावेळी आपल्याकडेच पाहतात.आपलं चैतन्य मुलांना दिलं तर ते वाढत जातं. मुलं चैतन्य परिधान करुन भारावून शिकत राहतात. त्यांच्या या टिपून घेण्याच्या सवयीला हेरलं पाहिजे . त्यांच्या सर्व गोष्टी तेव्हाच लक्षात राहतील , जेव्हा तुम्ही शिकवत असलेले शैक्षणिक घटक वेगळ्या पद्धतीने शिकवता. खेळत खेळत ज्ञानाची रचना करत शिकल्याने दृढीकरण होण्यास मदत होते. थोडेच शिकवा , पण जे शिकवाल ते त्यांच्या तनामनात कायमचे रुजले पाहिजे.

म्हणूनच मला या स्काऊट विषयाबद्दल कायमच कौतुक आणि अप्रूप वाटत आलं आहे. असा कोणताही विषय नसेल कदाचित जो तुम्ही स्काऊटमध्ये शिकवू शकत नाही. मानसिक आरोग्य , योग , दिशा , नकाशा , कृती , उपक्रम , गीतगायन , नृत्य , अभिनय , गृहकार्ये , सेवाकार्ये , संग्रह , रिकामपणाची कामगिरी , पाठांतर , संस्कारगाणी , संस्कारनाट्ये , संस्कारगोष्टी , संस्कारखेळ आणि अशा कितीतरी क्रियाकलापांनी स्काऊटचा अभ्यास आपल्या मुलांना समृद्ध बनवू शकतो. माझ्या जीवनात जेव्हा केव्हा दुःखाच्या आठवणींचे वारे वाहतात , तेव्हा तेव्हा मी स्काऊटला जवळ केले आहे. तुम्ही या स्काऊट चैतन्याचे महत्त्व जाणा आणि तुमच्या आयुष्यात अधिकचं चैतन्य आणा.

## कायद्याचे बोलूया!



श्रीनिवास भार्गवराम घैसास,
वकील- उच्च न्यायालय व नोटरी-
भारत सरकार
भ्रमणध्वनी- 9869080714.

# ७. ले आऊट/भूखंड एकत्रीकरण/विभाजन आणि त्यांचे नकाशे

ज्यावेळेस एखादी जमीन विकसित करायची ठरवली जाते त्यावेळी सर्वप्रथम ती जमीन कोणत्या क्षेत्रात समाविष्ट केली गेली आहे याची माहिती आपण करून घेतली पाहिजे. कारण जमिनीच्या वापराचा समतोल रहावा यासाठी राज्यांचा एक आराखडा बनवलेला असतो. अर्थात यामध्ये राजकारणी लोक बदल करतात हा भाग वेगळा. परंतु तो काही आपल्या पुस्तकाचा विषय नसल्यामुळे आपल्याला त्यावर काही टिप्पणी या ठिकाणी करायची नाही. त्यामुळे सदर जमीन कोणत्या क्षेत्रात मोडते हे पाहणे महत्त्वाचे ठरते. आता ज्या जमिनी ग्रीन झोनमध्ये असतात अशा जमिनीचा आपण विचार न करणे हे उत्तम. जर आपली जमीन रहिवासी अथवा औद्योगिक क्षेत्र म्हणून दाखवलेल्या विभागात असेल तर आपल्याला ती बिनशेती करण्याचा विचार करता येतो.

प्रत्येक राज्याचा भौगोलिकदृष्ट्या एक आराखडा बनलेला असतो. त्यासाठी प्रत्येक राज्याचा स्वतंत्र नगररचना विभाग कार्यरत असतो. एक नगररचना विभाग राज्यसरकारचा असतो तर इतर नगररचना विभाग हे त्या त्या महानगरपालिका आदींच्या अमलाखाली असतात. आराखड्यामध्ये प्रामुख्याने रहिवासी क्षेत्र, औद्योगिक क्षेत्र, शेतीक्षेत्र हे वेगवेगळ्या रंगांमध्ये दाखवलेले असते. असे करण्यामागचा उद्देश म्हणजे जमिनीचा नीट वापर योजनाबद्ध रितीने करणे असा असतो. अन्यथा पुढे शेतीसाठी जमीनच उरणार नाही. मग लोकांनी खायचे काय ? त्यासाठी हे आराखडे महत्त्वाचे असतात. त्यात उपरोक्त क्षेत्रांमध्ये समतोल साधलेला असतो.

त्यामुळे जेव्हा एखादी जमीन विकसित करण्याचे ठरते त्या वेळी तिचा ले-आऊट प्लॅन बनविला जातो. त्याचे दोन प्रकार असतात. एक म्हणजे तात्पुरता ले-आऊट आणि दुसरा म्हणजे अंतिम ले-आऊट. तात्पुरता ले-आऊट हा संमतीसाठी राखून ठेवलेला असतो. अशा ले- आऊटला जोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नगररचना विकास विभागाकडून अंतिम ले-आऊट मंजुरीचे पत्र मिळत नाही तोपर्यंत त्यातील प्लॉटस् हे विकता येत नाहीत. बऱ्याच वेळा तात्पुरते ले-आऊटमध्ये प्लॉटस् विक्रीसाठी काढून जमीन विकासक म्हणजे लॅन्ड डेव्हलपर्स हे लोकांची दिशाभूल करत असतात. त्यापोटी लाखो रूपयांचे अॅडव्हान्सेस घेऊन ठेवतात. तथापि हे योग्य नाही. तात्पुरता ले-आऊट हा अंतिम होत असताना नगररचना विभागाकडून त्यास हरकती घेतल्या जाऊ शकतात.

एखाद्या जमिनीमध्ये किती मोजमापाचे किती प्लॉटस् पाडावयाचे, ओपन स्पेस कशा ठेवायच्या, रस्त्यांचे प्रकार व किती रूंदीचे रस्ते आखावयाचे याबाबत नगररचना विभाग अंतिम निर्णय देत असते. त्यामुळे अंतिम ले- आऊटचा नकाशा हा तात्पुरता ले-आऊटच्या नकाशासारखाच असेल किंवा दिसेल असे नाही. त्यामुळे तात्पुरत्या ले-आऊटवर विसंबून प्लॉट खरेदी करणे जोखमीचे ठरू शकते.कारण ले-आऊट अंतिम होताना काही प्लॉटस् हे रद्द होऊ शकतात. काहींच्या सीमा बदलू शकतात.




अशा प्लॉटस्पोटी दिलेले अॅडव्हान्सेस विकासकाने जरी परत करण्याचे कबूल केले तरीही मध्यंतरीच्या काळात खरेदीदाराचा तोटा होऊन बसलेला असतोच. कारण त्याने ते पैसे इतरत्र चांगल्या ठिकाणी गुंतवले असते तर त्यात थोडीफार का होईना वृद्धी झाली असती. तेव्हा निसर्गाच्या सान्निध्यात, डॅम व्ह्यू प्रोजेक्ट, आमराईलगतचा प्रोजेक्ट, निसर्गरम्य वातावरणातील प्रोजेक्ट, डोंगराच्या कुशीतला प्रोजेक्ट, अमुक अमुक घाटातला प्रोजेक्ट अशी गोंडस नावे देऊन विकासक जाहिराती प्रसिद्ध करतात. अशा ठिकाणचे ले-आऊटस् अंतिम तर झालेले नसतातच पण कधी कधी अशा निसर्गरम्य ठिकाणच्या जमिनीदेखील बिनशेती झालेल्या नसतात. त्यामुळे निसर्गरम्य ठिकाणी पैसे गुंतवून ते गमावून मग रहात्या घरात उदास होण्याचा प्रसंग येऊ नये यासाठी खरेदीदाराने अत्यंत खबरदारी घेणे गरजेचे असते.

ले-आऊट अंतिम झाल्यानंतर प्लॉट खरेदी करणे केव्हाही चांगले. दोन पैसे जास्त गेले तरी चालतील. तसेच ले-आऊट नकाशामध्ये दाखविलेली लांबी-रुंदी व प्रत्यक्ष जागेवरील लांबी-रुंदी मोजून बघून घेणे गरजेचे असते. त्यामुळे नंतर तंटा होत नाही. दोन शेजारील प्लॉटधारकांमध्ये सीमेवरून वाद होत नाही. शक्यतो सरकारी भूमापकाकडून मोजणी करून घेणे कधीही चांगले. तथापि, सरकारी भूमापकावर कामाचा लोड वाढल्यामुळे त्यांना येणे शक्य होत नाही. त्यामुळे शासनाने दिनांक ०३ ऑक्टोबर, २०११ रोजी परवानाधारक भूमापकाकडून मोजणी करून घेण्याबाबत एक जी. आर. काढून त्यात सुलभता आणली आहे.

खरेदीदाराने आपल्या फाईलमध्ये ले-आऊट प्लॅनची मोठ्या आकारातील नीलप्रत म्हणजे ब्ल्यू प्रिंट लावून ठेवणे गरजेचे असते. म्हणजे पुढे प्लॉट विकताना त्या ब्ल्यू प्रिंटसाठी पायपीट करावी लागत नाही आणि तोपर्यंत विकासकाचे ऑफिसदेखील हललेले असते किंवा बंद पडलेले असते. मग अशा वेळी ही ब्ल्यू प्रिंट मिळणे फार मुश्कील होऊन बसते.

काही ठिकाणी जमीन चौरस फुटामध्ये मोजली जाते तर काही ठिकाणी चौरस मीटरमध्ये आणि काही ठिकाणी वारामध्ये मोजली जाते. त्यांच्यातील रूपांतरणाचे सूत्र माहिती असणे गरजेचे असते. आणि म्हणूनच आपण त्याचे कोष्टक पाहूया.

एक चौरस मीटर म्हणजे १०.७६ चौरस फूट किंवा १.१९ वार.

एक चौरस फूट म्हणजे ०.०९ चौरस मीटर किंवा ०.११ वार.

एक वार म्हणजे ०.८३६ चौरस मीटर किंवा ९ चौरस फूट.

एक वार म्हणजे १ चौरस यार्ड.

एक एकर म्हणजे ४०४६.८५६ चौरस मीटर किंवा ०.४० हेक्टर किंवा ४०.४६८ आर.

एक हेक्टर म्हणजे १०००० चौरस मीटर किंवा १०० आर किंवा २.४७ एकर.

**हल्ली मोबाईलमध्ये कन्व्हर्टर नावाचे अॅप्लिकेशन अथवा सॉफ्टवेअर डाऊनलोड केल्यास जवळपास सर्वच एककांचे परस्परसंबंध आपल्याला काही क्षणात आणि हवे तसे तपासता येतात. त्यामध्ये यार्ड म्हणजे वार हे ध्यानात असू द्यावे.**

---

## संगीत विश्वात बहरलेली रातराणी 'आशा भोसले'



### चित्रजगत

श्रीराम शेटये.
नालासोपारा

" लाडक्या बहिन योजनेच्या दिड हजार रुपयांची किंमत्त माझ्या पेक्षा जास्त कोणाला कळणार? हे दीड हजार रुपये आमच्या काळात सन १९४३ मध्ये मला कोणी दिले असते तर आम्ही दोन वेळचे जेवन तरी जेवलो असतो. तेव्हा आम्ही एक वेळ जेवायचो तेही नवरा घरी यायची वाट बघायला लागची. नवरा घरी आल्यावर आम्ही दोघे दिवसातून एकचवेळ जेवत असु "

मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यात आला. या कार्यक्रमात पंतप्रधान आणि त्यांच्या सोबत महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात बोलत असताना वयाची नव्वद वर्षे पार केलेल्या आशाताईंचे हे शब्द ऐकले आणी मन गहिवरुन आले. मन भुतकाळात गेले.

भारतीय संगीत विश्र्वात आणि जगभरात आशाताईं नावलौकिक मिळवूनही अंत्यत विनम्र आहेत. संगीत क्षेत्रात असे एकही शिखर नाही जे आशाताईनी पार केले नाही. गेली सुमारे आठ दशके आपल्या चाहत्यांच्या हृदयावर राज्य करणाऱ्या आशाताईनी आपल्या कारकिर्दीत किती आणि अशाप्रकारे गाणी दिली आहेत? त्याची गणना करणे केवळ अशक्य.

त्या काळातील सुपरस्टार लोकप्रिय अभेनेत्रि मधुबाला वर चित्रित झालेले 'हावडा ब्रीज' चित्रपटातील ते गाण मधुबालावर किती फीट होते? गाणे आहे 'आईए मेहरबा....' या गाण्याने त्याकाळातही चित्रपटगृहातील ऑडियन्स मध्ये तुफान यायच मधुबालाची लाजवाब अदाकारी ओ. पी. नय्यरच धुंद करणार संगीत आणि आशा भोसले यांचा अवाज हे समिकरण प्रेक्षकांना बेधुंद करायचे. भारतीय संगीत विश्वात आणि चित्रपट विश्वात गेली ऐशी वर्षे निर्विवाद प्रभुत्व असलेल्या आशाताईंचे हे शब्द हृदयाला छेदून आरपार गेले. अगदि लहान वयात वयाच्या नवव्या वर्षी आशाताईंचे वडील गेले. मराठी रंगभूमीवरील ते एक महान शास्त्रीय गायकनट होते. त्यांच्याअकाली जाण्यामुळे कुटुंबाची जबाबदारी आशा ताईंची मोठी बहिण लता मंगेशकर यांच्यावर आली. लता मंगेशकर कोवळ्या वयातच गाण्यासाठी मिळणाऱ्या तुटपुंज्या मानधनावर घर चालवत. पाच भांवड आणि आई असे सहा जणांचे कुट्रंब एवढ्या छोट्या मुलीने सर्वांचा उदरनिर्वाह करणे सोपी गोष्ट नव्हती. लता मंगेशकर यांचा गायन क्षेत्रात हळू हळू जम बसत होता पण याच काळात आपल्या अल्लड वयात आशाताई लतादिंचा सहाय्यक असलेल्या गणपत भोसले या तरूणाच्या प्रेमात पडल्या.दोघांनीही घरच्यांच्या विरोधात जाऊन लग्न केले. अवघ्या वयाच्या सोळाव्या वर्षी आशाताईनी उचललेले पाऊल त्यांना खुप महागात पडले. वैयक्तिक कौटुंबिक आयुष्यात अपयशी ठरलेल्या आशाताईंचा गायनक्षेतातील प्रवास मात्र गरूडझेप घेणारा ठरला.

संगीतकार दत्ता डावजेकर आणि लता मंगेशकर यांचे खुष सलोख्याचे आणि आपुलकिचे संबध होते. या चा रही मंगेशकर भगिनींना प्रथम गायला संधी देण्याचे श्रेय संगीतकार दत्ता डावजेकर यांना जाते. माझे बाळ या मराठी चित्रपटांत त्यांनी आशा भोसले यांना 'चल चल नव बाला' हे गाणे गायची संधी पहिल्यांदाच दिली. चुनरीया चित्रपटातील 'सावन आया' हे आशा भोसले यांचे पहिले हिंदी गाणे. महान संगीतकार ओ. पी. नैय्यर यांच्या सोबत काम करत असताना आशा भोसले यांची कारकिर्द चमकली. त्यांची भेट चित्रपट 'छम तमा छम' च्या सेटवर झाली होती. ओ. पी. नय्यर यांनी आशा भोसले यांना मंगू (१९५५) या चित्रपटासाठी गाण्याची संधी दिली होती.

ओ. पी. नय्यर यांनी 'बाप रे बाप' (१९५५), 'हम सब चोर है '(१९५६), 'सी. आय. डी.'(१९५६), 'दुनिया रंग रंगीली' (१९५७), ''मिस्टर कार्टून एम. ए.'(१९५८) या सुपरहिट चित्रपटात अशा भोसले यांना मोठी संधी दिली. मग ओ. पी. नय्यर आणि आशा भोसले यांच्या जोडीने अनेक हवादार आणि मोहक गाणी दिली.

आशा भोसले आणि ओ. पी. नय्यर यांच्या गाण्यांनी लोकप्रियतेचे शिखर गाठले. अनेक आकर्षक मोहक अंदाजातील गाणी सिनेमागृहातले प्रेक्षक या गाण्यांवर अक्षरक्षः सिनेमागृहात विंगमध्ये येऊन बेफाम होऊन नाचायला लागायचे. त्यात मधुबाला ची आकर्षक अदाकारी आणि कामुक हावभाव असलेले ''हावडा ब्रीज' (१९५८)मधल ''आईए मेहरबा. ...'हे गाणे. 'ये है रेशमी जुल्फो का अंधेरा'(मेरे सनम १९५८), 'तुमसा नही देखा '(१९५७), 'एक मुसाफिर एक हसिना'(१९६२) या चित्रपटातील सुपरहीट गाणी आशा भोसले यांची आहेत.

या जोडीने अनेक सुपरहीट युगल गीतेही दिली जसे 'मांग के साथ तुम्हारा ' व 'उडे जब जब जुल्फे तेरी'(नया दौर). 'आप युही अगर हमसे मिल ते रहे', 'मै प्यार का राही', या गाण्यांनी लोकप्रियतेचे सर्व रेकॉर्डस तोडले. 'दिवाना हुआ बादल' आणि 'इशारो इशारो मे' या महमद रफी यांच्या सोबत गायलेली युगलगीतांनी चित्रपट सृष्टीत ईतिहास घडविला.

आशाताईनी अनेक संगीतकारांसोबत काम केले. त्या काळातील सर्वच संगीतकारांसोबत आशाताईनी जगभरातील अनेक भाषेमधील गाणी आपल्या अमोघ आवाजाने अजरामर केली. संगीत निर्देशन उमर खय्याम यांच्या 'बीवी (१९४८), 'फुटपाथ', 'फिर सुबह होगी या सुपरहीट चित्रपटात त्यांना संधी दिली. परंतू खय्याम यांच्या सोबत केलेल्या 'उमराव जान' या अभिनेत्रि रेखा वर चित्रित केलेली गाणी यादगार आहेत.

ललित

# "आजची स्त्री"- स्वावलंबी,पण असुरक्षित..!

प्रा.के.एस.शिरबंदे
दापोली.

**ती ताई आहे, ती बहीण आहे**
**ती पत्नी आहे, ती मुलगी आहे**
**आयुष्याच्या प्रत्येक सुख दुःखात**
**सोबत असणारी, ती एक स्त्री आहे**
**आज ती स्वावलंबी आहे,**
**पण...असुरक्षित आहे..!**

**आजची स्त्री ही शिक्षणाच्या प्रभावाने धीट झाली, चार भिंती ओलांडून घराबाहेर पडली पण आज ती सुरक्षित आहे का..?**

आजच्या युगात स्त्री-पुरुष समानता मानली जाते, पण तिला पुरुषासारखा आदर सन्मान मिळतो का ? आजही काही महिला बऱ्याच अनिष्ट प्रथा, रुढी आणि परंपरा यामध्ये गुरफटल्या जात आहेत..! पुरुषप्रधान संस्कृतीमुळे त्यांच्यावर नेहमीच पुरुषांचे वर्चस्व होते, पण आता काळ बदलला आहे , त्या उच्चशिक्षित व संस्कारित झाल्या व नोकरीनिमित्त, व्यवसायानिमित्त घराबाहेर पडू लागल्या..! स्वतःच्या पायावर उभे राहू लागल्या, स्वाभिमानाने जगू लागल्या...! पण हे होत असतानाच समाजातल्या वाईट नजरा तिच्यावर पडू लागल्या..! तिची सुरक्षितता धोक्यात येऊ लागली..! त्यामुळे समाजापुढे एक नवे प्रश्नचिन्ह उभे राहिले..?

पूर्वीच्या काळी साधारण स्वातंत्र्यपूर्व काळात, स्त्री ही जास्त सुरक्षित होती, कारण तिच्याभोवती एक अविभक्त व मोठ्या कुटुंबाचे कवच होते, त्यावेळी तिचे चूल व मूल इतपतच आयुष्य सिमीत होते..! त्यावेळी तिला कुठलेही वैचारिक वा अभिव्यक्ती स्वातंत्र्य नव्हते, अशिक्षित होती, रूढी परंपराचे, सामाजिक दडपण होत! महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती. सावित्री बाई फुले, शाहू महाराज,महर्षी कर्वे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्त्रीमुक्ती व समतावादी आधुनिक विचाराच्या क्रांतीमुळे, स्वातंत्र्य गमावून बसलेली, घरातली बंदिस्त स्त्री उंबरठ्याबाहेर पडली व स्वाभिमानाने जगू लागली, हे स्थित्यंतर होत असताना तिला अभिव्यक्ती स्वातंत्र्य मिळत गेले, पण तिची सामाजिक सुरक्षितता धोक्यात येऊ लागली..! नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने, तिच्या राहणीमानामध्ये फरक पडला..! ती थोडी अप टू डेट राहू लागली,वेशभूषा बदलली, आणि समाजकंटकाच्या विखारी नजरा तिच्यावर पडू लागल्या व त्यातून स्त्रियांवर होणारे लैंगिक अत्याचार वाढू लागले..!

जशी स्त्री उच्चशिक्षित झाली, कमावू लागली, घराबाहेर पडू लागली , तस तशी तिच्या कौटुंबिक समस्या निर्माण होऊ लागल्या, घराकडे दुर्लक्ष होऊ लागल्यामुळे, तिच्या मुलांकडे दुर्लक्ष होऊ लागले, विभक्त कुटुंबामुळे घरी काळजी घेणारे, गोष्टी सांगणारे आजी-आजोबा नाहीत, मग त्यांची करमणूक व्हावी म्हणून श्रीमंत आई बापानी मग त्यांच्या हातात स्मार्टफोन, लॅपटॉप दिला गेला, त्यामुळे त्यांच्यावर चांगले संस्कार होण्याऐवजी वाईट पद्धतीने संस्कार होऊ लागले, मोबाईल वरील नको त्या अनिष्ट गोष्टी पाहू लागले, व त्याचा परिणाम त्यांच्या मनावर होऊ लागला..! या संस्कारातून मोठी झालेली,ही मुले पुढे कुमार्गाला लागली,पॉर्न व अश्लील व्हिडिओ पाहून ते कामवासनेने अंध होऊ लागले व त्यातूनच त्यांची पशुवृत्ती जागी होऊन समाजातील स्त्रिया व मुलीवरील त्यांचे अत्याचार सुरू झाले..!

**दोष कुणाला द्यायचा..?**

एकूण सध्याची सामाजिक परिस्थिती पाहता, स्त्री वरील होणारा अत्याचार हा अगदी लहान मुलीपर्यंत येऊन पोहोचला आहे. अगदी परवाचे बदलापूरचे प्रकरण हे एक त्याचे ठळक उदाहरण आहे..! आपण म्हणतो.. अशा लैंगिक अत्याचार करणाऱ्या व्यक्तीवर घरातून किंवा त्यांच्या आई-वडिलांकडून चांगले संस्कार झाले नसावेत, मला सांगा कोणाच्या आई वडील असले वाईट संस्कार करू शकतात का ? मग आई-वडिलांना का व कशासाठी दोष द्यायचा ? आई-वडिला शिवाय, त्या व्यक्तीचा मित्र परिवार, शाळा, त्याच्या आजूबाजूचे सामाजिक वातावरणचा देखील त्याच्या व्यक्तिमत्व विकासावर परिणाम करत असते !

.... समाज माध्यमाचाही त्याच्या एकूणच जडणघडणीवर परिणाम होत असतो.

... तो काय पाहतो, तो काय वाचतो, तो कुणाच्या संगतीत राहतो, याचा देखील परिणाम त्याच्या व्यक्तिमत्त्वावर होत असतो..!

....वाचन संस्कृती कमी झाल्यामुळे थोरामोठ्यांचे आदर्श त्यांना घेता येत नाहीत,

त्यामुळे अशी ही दिशाहीन व ध्येयहीन पिढी निर्माण होत आहे !

.... या सर्वांचा फटका एकूणच समाज निकोप व सुदृढ ठेवण्यासाठी होतो आहे.

...या सर्वांचे फलित म्हणजे,समाजातील दुर्बल घटक स्त्रिया व मुली यांच्यावरील अत्याचाराचे प्रमाण वाढले आहे.

...यात दोष नेमका कुणाचा आहे हे सांगणे कठीण आहे..!

.... तरी पण समाज माध्यमे, शाळा व. कॉलेजीस यांनी नवीन पिढीला नीती मूल्यांचे शिक्षण देऊन,जीवनाला योग्य ते दिशा .देण्याचे काम करूशकतील असे मला वाटते..!

***महाराष्ट्र राज्य सरकारच्या उपायोजना-**

**महाराष्ट्र राज्य सरकारने,स्त्री व बाल मुलांच्या संरक्षणासाठी जवळजवळ 17 उपायोजना केल्या आहेत, त्यातील 10 महत्त्वाच्या उपायोजना आपल्या माहितीसाठी देत आहे..!**

**हेल्पलाइन**-संकटात असणाऱ्या महिलांना मदत करण्यासाठी मुंबई, ठाणे आणि नवी मुंबई या पोलीस घटकांमध्ये टोल फ्री **हेल्पलाइन क्रमांक 103** व उर्वरित महाराष्ट्रासाठी टोल फ्री **हेल्पलाइन क्रमांक 1091** सुरू करण्यात आले आहेत.

* महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग (PAW)
* महिला सुरक्षा समिती.
* बस स्थानकातील मदत केंद्र.
* स्त्री भ्रूणहत्या प्रतिबंधक उपाय योजना.
* विशेष बाल सहाय्यक पोलीस पथक.
* लैंगिक अत्याचारापासून मुलांचे संरक्षण अधिनियम 2012.
* कौटुंबिक हिंसाचार अधिनियम 2005
* विशेष आणि जलद गती न्यायालय.
* हुंडाबळी प्रतिबंधक कारवाई.

**वरील सर्व प्रकारच्या मदतीसाठी आपण नजीकच्या पोलीस ठाण्यामध्ये संपर्क करू शकता..!**

*** माझे मत..!**

आपल्या माता-भगिनी व लेकीबाळीवर अत्याचार करणाऱ्या नराधमास कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे..

... एकूणच न्यायदानात होणारा विलंब पाहता, भले ती कायदेशीर व तांत्रिक असला तरी चीड आणणारा आहे..!

.... एकूणच गुन्हेगारीचे वाढते प्रमाण पाहता

..... शिक्षेचे स्वरूप बदलावे असे मला वाटते.

आता अट्टल गुन्हेगार फाशीच्या शिक्षेला देखील घाबरनेसा झाला आहे,त्यामुळे बलात्कारासारख्या गुन्ह्यासाठी इतिहास-कालीन शिक्षेचा विचार केला जावा असे मला वाटते, त्या शिक्षा अशा होत्या, जसे की...

**तोफेच्या तोंडी देणे, हत्तीच्या पायाखाली चिरडणे, कडेलोट करणे, भरचौकात चाबकाचे फटके देणे, शारीरिक अवयव कलम करणे इत्यादी.**

यासारख्या भयानक शिक्षेच्या भीतीमुळे तरी तो गुन्हा करण्यापूर्वी दहा वेळा विचार करेल..! व कुठलीही व्यक्ती मग असे कृत्य करण्याचे आयुष्यात धाडस करणार नाही..!

.....आपल्या कुणाला वरील शिक्षा ही अमानवी,अमानुष व पाशवी वाटेल, पण सामूहिक बलात्कार हा, त्या शिक्षेपेक्षा देखील अमानवी अमानुष्य व पाशवीच असतो , त्यामुळे त्या व्यक्तीला वरील शिक्षा देणेच योग्य ठरेल...!

**....अशाप्रकारे आरोपीच्या गुन्ह्यानुसार त्याला कठोरात कठोर शासन झाल्यास, समाजातील स्त्री व मुली निश्चितच सुरक्षित राहतील यात शंका नाही..!**

---

# जीवन सुंदर आहे!

**या जन्मावर या जगण्यावर**
**शतदा प्रेम करावे**

ज्येष्ठ कवी मंगेश पाडगावकर यांच्या या ओळी माणसाला जगण्याचा अर्थ उलगडून सांगतात. प्रत्येकाला जन्म हा एकदाच मिळतो. तो जगताना जन्मावर जीवापाड प्रेम करावे लागते असे यातून स्पष्ट होते. जन्माला आल्यापासून मरेपर्यंत आयुष्याच्या प्रवासात प्रत्येक गोष्टीचा आनंद घेत जीवन जगता आले तरच जीवन सुंदर होते. जीवन मुळातच सुंदर आहे फक्त त्याच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा सकारात्मक असला की, प्रवास सुखकर व आनंददायी होतो. आयुष्याच्या प्रवासात कितीतरी माणसे भेटतात. त्यातील काही आपल्याला अर्ध्या वाटेवर सोडून जातात तर काही आपली नसूनही रक्तापल्याड नात्याने ती कायमची जोडली जातात. प्रत्येक नात्याला प्रेमाने जिंकून रेशमी धाग्याने घट्ट बांधता आले तर आयुष्य अधिकच सुंदर होते. सुख दुःख तर प्रत्येकाच्या वाट्याला आलेले असतातच, परंतु दुःखात खचून न जाता त्याला धैर्याने सामोरे जातो तोच यशस्वी होतो. दुःख झाकून ठेऊन दुसऱ्यासाठी जो जगतो तोच आयुष्यात आनंदी राहतो. दुसऱ्याच्या अश्रूंचे मोल जाणून त्यांच्या हृदयात घर करतो तोच आपल्याही अश्रूंची फुले करण्यास यशस्वी होतो. झाडाची पाने गळून पडली तरी त्या जागी नवीन पालवी फुटते. पण माणसाचे तसे नाही. एकदा प्राण निघून गेला की, आयुष्याचा शेवट होतोच हा निसर्गाचा नियमच आहे. म्हणून आयुष्य आनंदाने जगताना इतरांनाही आनंदाने जगण्यास हातभार लावला पाहिजे ही मनाची तयारी प्रत्येकाने केली तरच आयुष्य सुंदर होईल. आपल्यापेक्षा किती तरी माणसे दुःखात चाचपडत असतात याचा आपण कधी विचारच करत नाही. आपलेच दुःख मोठे असे समजून आपण मनात कुढत, रडत राहतो. त्यातच आपले आयुष्य कधी निघून जाते हे आपल्याला कळत देखील नाही. दुःखातही मी खूप सुखी, समाधानी आहे अशी मनाची धारणा केली तरच जगण्याचा अर्थ कळेल. स्वत:तला अहंकार, मीपणा सोडून जो दुरितांची सेवा करतो. सेवेतून इतरांना आनंद देतो. त्याचे जीवन फुलाप्रमाणे सुगंधित होते. जो दुस-याचे आयुष्य कोणतीही अपेक्षा न ठेवता सुगंधित करतो त्याच्या आयुष्यात फुलांचा वर्षाव होत असतो.

आयुष्यात अनेक चढ उतार येतात.वादळ वा-यांना समर्थपणे सामोरे जाण्याची हिंमत माणसाने ठेवली पाहिजे. एका फळात किती बिया आहेत हे आपण मोजू शकतो, परंतु एका बीमध्ये किती फळे

( पान ७ वर)

# दीपावली : आह्निकाचा शुभारंभ

## अध्यात्म



ज्योतिर्विद उदय दुदवडकर,
बुरंबावडे- देवगड
मो.८३९००५३९८४

आन्हिक, आचार, देवपूजा, उपासना या व अशा सर्व बाबी म्हणजे धर्माची विविध अंगे होत. ' संस्कार ' हा धर्माचा ' आत्मा ' आहे. संस्कार नसेल तर धर्माचे कोणतेही अंग माणसाच्या अंगी रुजणार नाही आणि मोक्षासाठी आवश्यक असणाऱ्या धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थांतील ' धर्म ' हा पुरुषार्थ साध्य होणे अशक्यप्रायच. खाणीतील सोने त्यावर केल्या जाणाऱ्या यथोचित संस्कारांनी जसे उजळते आणि मौल्यवान ठरते तसेच माणसाचे जीवनही यथोचित संस्कारांनी उजळते आणि अनमोल ठरते.

संस्काराच्या बाबतीत ठराविक काळ, धार्मिक विधी, वशिष्ठ यथोचित अशा परंपरा या गोष्टी जितक्या महत्त्वाच्या आहेत तितक्याच महत्त्वाची आहे ' संस्कार चिकित्सा '. केवळ गतानुगतीक पद्धतीने, परंपरेनुसार, रुढीनुसार बहुतांशी संस्कार केले जात असतात. त्या संस्कारांमागील संकल्पना व प्रयोजन माहित नसते. यामुळे त्या संस्कारांचे महत्त्व मनावर ठसत नसते आणि परिणामतः त्यांचे अपेक्षित परिणाम दिसून येत नसतात.

माणसाच्या नित्यकर्मातील आह्निक हे एक धर्मांग कृत्य आहे. या कृत्यात संस्कार आहे. कोणत्याही दिवसाची सुरुवात प्रसन्न व्हावी असे वाटत असेल तर प्रत्येकाने सूर्योदयापूर्वी लवकर उठणे, सूर्योदय होण्याच्या फार आधी म्हणजेच भल्या पहाटे आकाशात तारका दिसत असताना स्नान करणे, योग साधना करणे, दीप उजळणे, देवपूजा करणे, देवांचे नामस्मरण किंवा स्तोत्र वाचन करणे, सुश्राव्य संगीत श्रवण करणे असे काही संस्कार स्वीकारावेत असे ग्रंथांतून सुचविले गेले आहे. मांगलिकतेसाठी घरात, प्रवेशद्वारी, अंगणात, घराभोवती सडासंमार्जन करणे, रांगोळी रेखणे, दीप प्रज्वलित करुन परिसर उजळविणे आणि या मनोरम्य प्रकाशाने सूर्यकिरणांचे स्वागत करणे असाही संस्कार प्रचलित आहे. यातून मन, आत्मा आणि शरीर यांच्यावर होणारे सुलभ संस्कार कळत नकळत मन, आत्मा आणि शरीर यांचे संतुलन व ऐक्य साधतात आणि चेतनेला उज्वल आणि प्रगल्भ करतात. ही चेतना विद्युत लहरीस्वरूप शरीरात क्रियाशील बनून कार्यशक्ती (ऊर्जा) देते आणि दिवसभरात उस्फूर्त कार्यसाधना होते.

दिवाळीला जणु दिवस शुभ जाण्यासाठीच्या संस्कारांचा शुभारंभच होत असतो. भल्या पहाटे ब्रह्ममुहूर्तावर उठून आकाशात तारकांची उपस्थिती असताना अभ्यंग स्नानाने अंतर्बाह्य देह शुद्धीकरण करणे, आकाश कंदील व दिव्यांची पंगत (दीपावली) घरालगत उजळून प्रतिकात्मकतेने आकाशातील तारकांना पृथ्वीवर आणणे. जणू तारांगण धरणीवर अवतरवणे ही संकल्पना आहे. अंधाराच्या पार्श्वभूमीवर तारका लाखाकताना स्पष्ट दिसत असतात आणि मनाला भावत असतात त्याचवेळी तारकांच्या प्रभेला उजाळा देणारा पार्श्व अंधारही आपल्याला मोहवून जातो. तिमिर आणि तेज यांचे अटळ घनिष्ट ' सहकारी ' नाते यावेळी जीवनातील सुख-दुःख, अपेक्षित-अनपेक्षित यांमधील आभासी अंतर नाहीसे करते आणि येथे जीवनाच्या विजिगिषेच्या संकल्पनेची नांदी होते. तारका दर्शनाचे याचसाठी महत्त्व आहे.

धर्मशास्त्रात आन्हिकास प्राधान्य दिलेले आहे. ' अह् ' म्हणजे दिवस. पहाटे उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत नित्यक्रमात दिवसभरात ज्या गोष्टी येतात त्यांना ' आह्निक ' अशी संज्ञा आहे.




आह्निकाच्या प्रमुख अत्यावश्यक अंगांमध्ये गणले गेलेले एक अंग म्हणजे ' संध्या '. संध्येमागे पंचमहाभौतिक देहाचे शुद्धीकरण हा एकच उद्देश आहे असे नव्हे तर मानवी देहाचे अन्नमय, प्राणमय, वासनामय... इत्यादी सर्व कोश शुद्ध करून मोक्ष प्राप्ती करून घेणे हे व्यापक उद्दिष्ट आहे. आरोग्यदायी दीर्घायुष्यप्राप्ती हे ऐहिक फलितही संध्येने साधते. कित्येक ऋषीमुनी दीर्घसंध्या करून दीर्घायुषी झालेले आहेत. संध्या जितकी यथोचित कालासापेक्ष नियमित घडेल तितकी आयुष्यमर्यादा वाढेल असे सूत्र ग्रंथात नमूद आहे. कालसापेक्षेनुसार संध्येचे १) मुख्य, २) मध्यम आणि ३) गौण असे तीन प्रकार आहेत. ' उत्तमा तारकोपेता मध्यमा लुप्त तारका। कनिष्ठा सूर्यसहिता प्रातःसंध्या त्रिधा स्मृता ॥ ' अर्थात पहाटे तारका स्पष्ट दिसत असताना केलेली प्रातःसंध्या ही सर्वोत्तम, तारका दिसेनाशा झाल्यावर परंतु सूर्योदयापूर्वी केलेली संध्या ही मध्यम व सूर्य उगवल्यावर केलेली संध्या ही कनिष्ठ होय. तसेच सायंकाळच्या संध्येबाबत, ' उत्तमा सूर्यसहिता मध्यमां लुप्तभास्करा। कनिष्ठा तारकोपेता सायंसंध्या त्रिधा स्मृता ॥ ' अर्थात सूर्य मावळण्यापूर्वी केलेली सायंसंध्या उत्तम, सूर्य मावळल्यानंतर परंतु तारकादर्शन होण्यापूर्वी केलेली संध्या मध्यम व तारकादर्शन झाल्यावर रात्री केलेली संध्या कनिष्ठ होय. दिवाळीला उत्तम प्रातःसंध्या साधून जणू वर्षभरातील आह्निकांचा शुभारंभच केला जात असतो.

' अध्यात्म ' या सदरात यापूर्वी आपण जाणून घेतलेले आहे की, ब्रह्मांडातील ग्रहताऱ्यांचा, तारकापुंजांचा अर्थात नक्षत्रांचा आपल्या जीवनातील घडामोडींवर प्रभाव पडत असतो. ' आवली ' म्हणजे ओळ, रांग किंवा पंगत. ' दीपावली ' म्हणजे दिव्यांची पंगत. पहाटे आणि सायंकाळी घराभोवती परिसरात ओळीने दिव्यांची आरास करून आकाशातील ग्रह, तारे आणि नक्षत्रे यांना दिपोवाळणी करून त्यांच्याप्रती कृतज्ञता अभिव्यक्त करणे अशी संकल्पना दीपावलीमागे आहे. प्रातःकाळ आणि सायंकाळ या दोन्ही वेळा तेज आणि तिमिर यांचे संधिकाल आहेत. हे जसे रोज येत असतात तसेच आपल्या जीवनातील आशा-निराशा, अपेक्षा-उपेक्षा, सुख-दुःख, यश-अपयश यांचे संधीकाल हे रोजच येत असतात. अशावेळी विवेकाने निर्णय घेण्याच्या क्षमतेचे कवच संध्या साधनेतून प्राप्त होत असते.

**संधीचे महत्त्व समजून देऊन साधण्यास प्रवृत्त करणारा सण म्हणजे ' दिवाळी '. संध्या साधनेतून सर्वांच्या जीवनात रोजच दिवाळी सण नांदावा ही शुभकामना!**

---

## तिचा गौरव



चित्रा अविनाश नानिवडेकर,
सफाळे- पालघर.
मो. 9969669523

# आजच्या दुर्गा...! (अंतिम भाग)

**निराशेच्या खोल गर्तेत जाऊन आत्महत्या करणे इतकंच मनात ठेवून ती सरळ रोडवर आली. बस च्या टायरखाली चिरडून स्वतःला संपवणे एवढेच मनात होते. त्याला कारण सुद्धा तसेच घडले...काय कहाणी आहे सेल्वी गौडाची?**

म्हैसूरमध्ये राहणारी सेल्वी केवळ 14 व्या वर्षी बालवयात गौडा ह्यांच्या घरी लग्न होऊन आली. तिकडेच तिची फसगत झाली. पैशाच्या लोभाने तिच्या पतिनेच तिला विकायचे ठरवले. अर्थात त्याचा मनसुबा वेळीच लक्षात येऊन तिने त्या घरातून पळ काढला. पण तिच्या मागावर माणसं होती. म्हणूनच तिने बस खाली जाऊन आत्महत्या करायची ठरवली.

पण एका अनामिक शक्तीने तिला ह्यातून वाचवले म्हणायचे. कारण बसखाली न जाता तिने बस मध्ये चढायचे ठरवले. तिकिटाचे पैसे नसल्याने तिला म्हैसूरच्या सेंट फिलोमीना चर्च समोर उतरावे लागले. पण इकडेच तिचे जीवन पालटले. तिला चर्चने आश्रय दिला. इतकेच नव्हे तर आधी तिला भुवया कोरण्याचे थ्रेडींगचे प्रशिक्षण दिले. पण सेल्वी ची झेप जास्त आव्हानात्मक शिकण्याची आहे ह्याची कल्पना तिकडच्या संचालकांना आली.

तिला ओडानाडी येथील महिलांच्या आश्रमशाळेत पाठविण्यात आले. साधी सायकलसुद्धा कधी वापरली नसलेल्या सेल्वीला ड्रायव्हिंग शिकण्याची इच्छा होती. आणि ती जिद्दीने तिने पूर्ण केली. प्रशिक्षण घेताना खूप काळजी -पूर्वक माहिती करून घेणे. वाहतूकीचे नियम बारकाईने पाठ



करणे.. आपण जरा जरी चुकलो तर आपल्याला ह्या शिक्षणातून वगळण्यात येईल आणि आपलं स्वप्न संपून जाईल. ह्या भीतीने जिद्दीने तिने हे शिक्षण पूर्ण केले.

2004 मध्ये म्हैसूर सारख्या शहरात सेल्वी पहिली महिला कॅबी झाली.तिच्या बरोबर आणखी दोघी सुद्धा कॅबी म्हणून कार्यरत झाल्या.

शिक्षण घेतल्यानंतर वाहन खरेदी करण्यासाठी पैसे कुठून आणणार? तेंव्हा आजच्या सारख्या वाहन कंपनी झाल्या नव्हत्या. पण चर्च शेल्टरने त्यांना ओम्नी,आणि मारुती सुझुकी घ्यायला मदत केली. लौकरच त्यांनी परतफेड केली.

एकदा त्यांच्या कॅबी रस्त्यावर धावू लागल्या. हळूहळू त्यांनी कंपनीशी टायप करून महिला कर्मचाऱ्यांना पोहचवणे आणणे ही जबाबदारी घेतली.येता जाता महिलांशी संवाद साधून त्यांच्या समस्या ऐकणे हे सुद्धा सेल्वी करत असे. इतकेच नाही तर इतर महिलांना कॅबी होण्यासाठी उदयुक्त करून त्यांना प्रशिक्षण देणे हे सुद्धा करत असे.

ती पोट तिडिकेने सांगत असे की "संकटात तुमचे आई, वडिल, भाऊ बहिणी मदतीला येतील असे अजिबात समजू नका. तुम्हाला संकटातून स्वतःला मार्ग काढायचा असणारे. तेंव्हा स्वतःला काय पाहिजे हे तपासून आपली ध्येय निश्चित करून ती साध्य होण्या इतका आत्मविश्वास स्वतः मध्ये निर्माण करा"

सेल्वी च्या कामाची दखल घेऊन कॅनडीयन चित्रपट निर्मत्या एलिसा पोलोची ह्यांनी "ड्रायव्हिंग विथ सेल्वी " हा माहितीपट निर्माण केला आहे. बस च्या टायर खाली आत्महत्या करणारी एक दुर्गा त्याच टायरचे हत्यार करून हातात व्हील घेणाऱ्या सेल्वीला शतशः प्रणाम.

**(विशेष सहाय्य=राजश्री शिंपी.)**

# सरकारी योजना/नोकरी

## कृषी वाहन कर्ज योजना

**कृषी क्षेत्रात वाहन खरेदीसाठी शेतकऱ्यांसाठी काही बँका आणि वित्तीय संस्थांकडून विशेष योजना उपलब्ध आहेत. दुचाकी आणि तीनचाकी वाहनांच्या खरेदीसाठी काही महत्त्वाच्या योजनेचा आढावा खालीलप्रमाणे आहे.**

### १. बँक ऑफ महाराष्ट्र - कृषी वाहन कर्ज योजना

- **उद्देश**: शेतकऱ्यांना कृषी क्षेत्राशी संबंधित कार्यांसाठी दुचाकी किंवा तीनचाकी वाहन खरेदी करण्यासाठी वित्तीय मदत करणे.
- **कर्जाची रक्कम**: वाहनाच्या किमतीवर अवलंबून, साधारण ८५% ते ९०% पर्यंत कर्ज दिले जाते.
- **परतफेड कालावधी**: ३ ते ५ वर्षांचा परतफेड कालावधी उपलब्ध आहे.
- **व्याजदर:** शेतकऱ्यांच्या क्रेडिट स्कोअरवर अवलंबून व्याजदर ठरवले जातात.
- **प्रक्रिया शुल्क**: बँकाच्या नियमांनुसार प्रक्रिया शुल्क लागू होते.
- **विशेष बाब:** फक्त कृषि कार्यासाठी वापरले जाणारे वाहन (साधारण दुचाकी, तीनचाकी) कर्ज उपलब्ध आहे.

### २. महात्मा फुले कर्जमुक्ती योजना - दुचाकी/तीनचाकी खरेदी कर्ज

- **योजना उद्देश:** शेतकऱ्यांना कमी व्याजदरात दुचाकी/तीनचाकी खरेदीसाठी आर्थिक मदत.
- **उपलब्ध रक्कम:** वाहनाच्या ८५% पर्यंत कर्ज.
- **सवलतीचा व्याजदर**: ही योजना कृषि क्षेत्राशी संबंधित असल्याने व्याजदर कमी ठेवला जातो.
- **परतफेड कालावधी**: ५ वर्षांपर्यंत.
- **कागदपत्रे:** आधार कार्ड, शेतकरी खाते पुस्तक, वाहनाचा कोटेशन इत्यादी आवश्यक.

### ३. राष्ट्रीयकृत बँका आणि सहकारी बँकांचे वाहन कर्ज

- **व्याजदर:** बँकेच्या नियमांनुसार व्याजदर ९% पासून सुरु होतो.
- **परतफेड कालावधी:** साधारणत: ३-५ वर्षे.
- **सुरक्षायोजना:** विविध विमा योजना आणि सुरक्षितता घटकांसाठी विविध बँका सुविधा देतात.

### ४. महिंद्रा फायनान्स - कृषी वाहन कर्ज

- **योजना उद्देश:** महिंद्रा फायनान्सकडून दुचाकी आणि तीनचाकी खरेदीसाठी सुलभ कर्ज पुरवठा.
- **कर्जाची रक्कम**: वाहनाच्या ९०% पर्यंत कर्ज.
- **परतफेड कालावधी:** ३ ते ५ वर्षांचा कालावधी.
- **अन्य सेवा:** जलद प्रक्रिया आणि कमी कागदपत्रांची आवश्यकता.

### ५. प्रधानमंत्री मुद्रा योजना अंतर्गत दुचाकी/तीनचाकी कर्ज

- **मुद्रा योजनेतून उपलब्ध कर्ज प्रकार:** शिशू (५०,००० रु. पर्यंत), किशोर (५०,००० - ५ लाख रु.), आणि तरुण (५ लाखांहून अधिक) अशा स्तरांमध्ये कर्ज उपलब्ध.
- **सवलतीचा व्याजदर:** कमी व्याजदर उपलब्ध.
- **परतफेड कालावधी:** ३-५ वर्षांचा कालावधी.
- **कागदपत्रे:** ओळखपत्र, पत्ता पुरावा, उत्पन्न प्रमाणपत्र इत्यादी आवश्यक.

**अर्ज प्रक्रिया:** बँकेकडे किंवा वित्तीय संस्थेकडे जाऊन अर्ज करता येतो.

## बँक ऑफ महाराष्ट्र (महा बँक) ची सुवर्ण तारण कर्ज योजना

- **बँक ऑफ महाराष्ट्र (महा बँक) ची सुवर्ण तारण कर्ज योजना म्हणजेच गोल्ड लोन ही एक अशी कर्ज योजना आहे, ज्यामध्ये ग्राहकांना त्यांच्या सोन्याच्या दागिन्यांवर आधारित तारण कर्ज दिले जाते. शेतकऱ्यांसाठी, वैयक्तिक गरजा किंवा व्यवसायासाठी ही योजना उपयुक्त आहे कारण यामध्ये कमी वेळेत आणि सोप्या प्रक्रियेद्वारे कर्ज उपलब्ध होते.**

### महाबँक सुवर्ण तारण कर्ज योजनेचे मुख्य वैशिष्ट्ये:

**१. कर्ज रक्कम:**
- ग्राहकांच्या सोन्याच्या तारणावर आधारित कर्जाची रक्कम ठरवली जाते.
- सामान्यत: ५०,००० ते २५ लाखांपर्यंत कर्ज उपलब्ध असते.
- यामध्ये सोन्याच्या शुद्धतेनुसार (कॅरेट प्रमाण) कर्जाची रक्कम बदलू शकते.

**२. व्याजदर:**
- सुवर्ण तारण कर्जावर व्याजदर साधारणतः ७% ते ९% पर्यंत असतो.
- बँक ऑफ महाराष्ट्रच्या अधिकृत व्याजदरांमध्ये वेळोवेळी बदल होऊ शकतो.

**३. परतफेड कालावधी:**
- कर्ज परतफेडीसाठी ६ महिने ते १२ महिन्यांपर्यंतचा कालावधी दिला जातो.
- काही वेळा ग्राहकाच्या आवश्यकता आणि बँकेच्या धोरणानुसार परतफेडीचा कालावधी वाढवला जाऊ शकतो.

**४. उपलब्धता आणि प्रक्रिया:**
- कर्ज मिळण्यासाठी सोन्याचे प्रमाणपत्र व त्याचे वजन आवश्यक आहे.
- अर्जदाराच्या आधारकार्ड, पॅन कार्ड, आणि पत्ता पुरावा आवश्यक.
- अर्ज केल्यानंतर त्वरित प्रक्रिया करून कमीत कमी वेळेत कर्ज वितरित केले जाते.

**५. कर्जाचा वापर:**
- या कर्जाचा वापर शेती, वैयक्तिक गरजा, शिक्षण, लग्न, व्यवसाय वाढविणे इत्यादी गोष्टींसाठी करता येतो.

**६. प्रोसेसिंग फी:**
- कमी प्रोसेसिंग फी आकारली जाते.
- काही वेळा, विशेष योजना अंतर्गत प्रोसेसिंग फी माफ केली जाते.

### सुवर्ण तारण कर्जासाठी अर्ज कसा करावा:
- जवळच्या बँक ऑफ महाराष्ट्र शाखेत जाऊन अर्ज करता येतो.
- आवश्यक कागदपत्रांसह तारण म्हणून सोन्याचे दागिने जमा करावे लागतात.
- बँकेकडून सोन्याचे मूल्यांकन केल्यानंतर कर्ज मंजूर हो**ते.**

**महत्त्वाची टिपण्णी:**
- सोन्याच्या शुद्धतेवर कर्ज रक्कम अवलंबून असते; किमान २२ कॅरेट शुद्धता असणे आवश्यक आहे.
- कर्जाची परतफेड नियमितपणे करणे आवश्यक आहे अन्यथा बँकेकडून तारण ठेवलेले सोने जप्त केले जाऊ शकते.

**फायदे:**
- त्वरित निधीची गरज भागवण्याचा एक चांगला पर्याय.
- कमी कागदपत्रांची आवश्यकता आणि जलद प्रक्रिया.
- सोन्याच्या सुरक्षिततेची पूर्ण हमी बँकेकडून दिली जाते.
- महाबँक सुवर्ण तारण कर्ज योजना आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी एक उत्तम पर्याय आहे, विशेषत: जेव्हा त्वरित निधीची आवश्यकता असते.

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार(मुख्य आवृत्ती ,सिंधुदुर्ग,)संस्थापक,संपादक,कै.प्राचार्य मुकुंद.कदम MALLB** मालक,मुद्रांक,प्रकाशक ॲड रुपाली कदम डांगे **BSL,LLB,MCA RNI No.४३७११/८५** मुद्रणस्थळ न्यू विक्रम मुद्रणालय,कोपर्डे,जि .कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२०४ येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग, महाराष्ट्र ४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ: एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग,महाराष्ट्र ४१६००२ .उपसंपादक-विक्रम कदम,कार्यकारी संपादक -प्रा.उज्वला राठोड, डॉ.शर्मिला कदम राजपूत.ई मेल कार्यालयीन पत्रव्यवहार व जाहिरातींसाठी **संपर्क**:**rupasamachar@gmail.com**,बातमी व फोटोंसाठी **संपर्क**:**sindhudurg.samachar@gmail.com** सिंधुदुर्ग -फोन ०२३६७-२३२१९२५, मुंबई,पुणे -९८२२९७९७३२, अरिहंत अपार्टमेंट फोन ०२३१- २५२३००५ मुंबई कार्यालय- सत्यवान बिल्डिंग,पडवळनगर ए ठाणे वेस्ट ४००६०४ .Whatsapp-9108766862

## आठवणींच्या गोष्टी



राष्ट्रपाल सावंत,
चिपळूण- रत्नागिरी
मो. ९४०३७४४३९६..

# निर्भीड स्वभावाचा दिलदार कलावंत कवीगायक जनार्दन धोत्रे




कलेच्या माध्यमातून समाज प्रबोधन करणारे बहुतांश कलावंत हे त्या कलेच्या आधाराने आपला चरितार्थ चालविणारे मी पाहिलेत, काहींची हलाखीही जवळून पाहिली आहे, हाताच्या बोटावर मोजता येतील असे काही खाजगी आणि एखाद दुसरा सरकारी नोकरी सांभाळून छंद म्हणून कला जोपासून प्रबोधन करणारेही पाहिलेत . अशातीलच एक कोकणातील रत्नागिरी जिल्हातील खेड तालुक्यातील आंबये गावचे सुपुत्र ज्यांचं शिक्षणं फक्तं सातवी पर्यंत झाले होते. मुंबईत कांदिवली येथे महेंद्रा अँड महिंद्रा कंपनीत नोकरी करून मुंबईत विलेपार्ले, बामणवाडा येथे राहत होते. १४एप्रिल ते तीस मे पर्यंत त्यांच्या गायनाचे सलग कार्यक्रम व्हायचे. कंपनी त्यांना रजा मंजुरीही द्यायची असे ख्यातनाम कवी गायक जनार्दन धोत्रे दादा यांना जेमतेम अठ्ठेचाळीस वर्षांच आयुष्य मिळाले पण या आयुष्यात त्यांनी एक कलावंत म्हणून सर्वत्र नाव लौकिक मिळविला. पहाडी बहारदार आवाज आणि तेवढयाच ताकदीची लेखणी यामुळं त्यांचं नावं अजरामर आहे.

**"कधी ना कधी, या बहिणीची आठवण येईल जेव्हां
ढवळ्या पवल्याची खिल्लारी जोडी
जुंपून येईल तेव्हा ग
माझा बंधुराज येईल
मला माहेराला नेईल "**

या त्यांच्या गीताशिवाय त्यांचा कार्यक्रम संपलाच नाही आणि हे गीत ऐकून महिलांसह पुरुषांच्या डोळ्यात अश्रू आले नाहीत असं कधी घडलच नाही. वर पुन्हा बक्षिसांची खैरात ती वेगळीच. हे कुणी सांगितलेलं नाही मी स्वतः मुंबईत त्यांचे कार्यक्रम जिथे असतील तिथे जाऊन प्रेक्षकांत त्यांच्या समोर बसून ऐकले आहेत.

**"भली भूषणे ते कपडे
तनभर नसायचे
माझ्या भीमाला तेव्हा
सारेच हसायचे."**

**"जगा वेगळी भीमाची अर्धांगिनी
धन्य ती रमाई सौभागिनी
पत्थरावरी जैसा, चंदन पिसावा
देहा ना मिळावा तैसा विसावा
चतकोरीतून करी ती विभागणी "**

हे त्याचं रमाई गीत लोकप्रिय होतें.

जनार्दन धोत्रे हे धार्मिक, सामाजिक, प्रबोधन गीतासाठी लोकप्रिय होते तसेच ते लोकगीतांसाठी प्रख्यात होते. प्रथम ते गोपचंद जी रूके यांची गीते गात आणि नंतर स्वतः गीत लिहू लागले. अनेक ख्यातनाम गायिका सोबत त्याचे सामने रंगले. स्टेजवर एकमेकास कितीही गाण्यातून बोलले तरी शेवटीं एकमेकांचा आदर राखीत, सर्वांशी जिव्हाळ्याचे बहीण भावासारखे बंधुत्वाचे संबंध. ते उत्तम कवी गायक होतेच पण दुसऱ्याला स्वतःच्या हाताने जेवणं बनवून खायला देणं , कुणीही नवा जुना कलावंत रसिक घरी आल्यावर त्याचं आदरतिथ्य करण हा त्याचा स्वभाव होता. पैसा मिळतोय म्हणून त्यांनी आयोजक यांना खुश करण्यासाठी कोणतीही गीत न गाता. स्वतःला जे योग्य वाटल ते गायल आहे. पैसे देउन तुमच्या पुढारी, कार्यकर्ते यांची गीत गायला मला सांगू नका. मी बुद्ध भीमाची गाणी फुकट गायन करीन अस ते स्टेजवरून जाहीर बोलत. मी डरणारा नव्हे, लढणारा गायक आहे असंही सांगत. लोकशाहीर विठ्ठल उमप, प्रभाकर पोखरिकर,अशा दिग्गज पुरुष कलावंत सोबतही त्यांनी जुगलबंदी कार्यक्रम केलेत. "भन्नाट नाचतोय मोर," काही प्रबोधन , धार्मिक भीम बुद्ध ऑडिओ ला त्यांनी गायल आहे. त्यांची बहुतांश गाणी ही स्वतंत्र चालीची होती हे त्यांच्या गीत लेखन गायनाचे वैशिष्ट्ये होते. गीताला आवश्यक हावभाव, देखणा रुबाबदार गायक. पण गर्व नव्हता.

**"कंठात स्वराला त्राण नसे
तुज साठी रसिका गात आहे
हे ढळणारे गीत संपवूनी
जय भीम करुनी मी जातो आहे "**

**"कंठात स्वराला त्राण नसे
तुज साठी रसिका गात आहे
हे ढळणारे गीत संपवूनी
जय भीम करुनी मी जातो आहे "**

असं लिहिणाऱ्या या कवीला आपल्या अल्पायुषाची चाहूल लागली होती की काय? असं मनात सहज येतं. पोटासाठी गाणं आणि चळवळसाठी गाणं वेगळं. कारण भरगच्च पगाराची नोकरी असून केवळ सहकलाकार यांच्या आणि समाज, धम्म चळवळ करिता गाणारे गायक कलावंत कमीचं मात्र धोत्रेनी प्रबोधन वसा जपला , नामांतर, रिडल्स, ऐक्याची गाणी लिहिली नी गायली आहेत. दोन वेळा त्यांच्या घरी मी गेलोय. १९९१मे च्या तिसऱ्या आठवड्यात मुंबई अंधेरी मरोळ भंडारवाडा येथे मी राहत असलेल्या भागात "आंनंदा बुध्द विहाराच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या मनोरंजन कार्यक्रम अडव्हांस रक्कम देण्यासाठी मी त्यांच्या घरी गेलो होतो. रात्रभर त्यांचा आणि प्रख्यात गायिका सुषमादेवी ताईचा गीतगायन कार्यक्रम ऐकून दुसऱ्या दिवशी दुपारी तीन ते सहा असा मी बी ए चा पेपर दिल्याची आठवण मला आहे . खेड, दापोली, मंडणगड सह काही भागातील नवोदित कवी गायक यांना त्यांचं मार्गदर्शन,प्रोत्साहन मिळाले आहे. मी बाबासाहेब यांच्या विचारणा मानतो, तेचं लिहितो गातो आणि समाजाला सांगतो. समाजाचा देणेकरी आहे म्हणून गीत गायन करतोय सांगत. १९९१ला डॉ बाबासाहेब आंबेडकर कला निकेतन नावाची आगमे बाबू कव्वाल यांच्या पुढाकाराने एक संस्था स्थापन झाली. त्यात मी,आनंद दादाशिंदेसह अन्य कलावंत सभासद् होतो. या संस्थेमार्फत१९९३ला एक ऑडिओ कसेट काढली त्यातल एक नंबरला जनार्दन धोत्रे दादांचं गीत होत

**"तथागताच्या धामी मिळाली
मंगल जीवनी कुस्सलस्स
नमो तस्स भगवतो अरहतो
संमासंबुद्धस"**

असे त्या गीताचे बोल होते.

मी गावी असल्याने माझ गीत उशीरा पोहचल त्यामुळं ते रेकॉर्डिंग झालं नाही .आजही हे गीत दादांचे अनेक शिष्य गातात पण धोत्रेच हेच गीत कवी गायक मंगेशदादा जाधव यांनी पुन्हा आपल्या आवाजात रेकॉर्डिंग केलंय.

धोत्रे दादांच्या आजारपणामुळे ते तसे अल्पवयातच गेले. या कला संगीत कार्यात त्यांच्या कडून यापेक्षाही उत्तम लेखन गायन महाराष्ट्राला मिळालं असतें पण निसर्ग नियमापुढे मानव हतबल आहे .महाराष्ट्रातील अनेक कवी गायक गायिका कोकणात येतात तेव्हा ते आवर्जुन धोत्रे दादांचं "माझा बंधुराज येईल मला माहेराला नेईल" हे गीत गातात तेव्हा त्यांच्या आणि उपस्थित सर्वांच्या डोळ्यात अश्रू येतात. हीच त्यांच्या लेखनाची ताकद आहे. त्यांची लोकगीतंही भन्नाट आहेत. मी त्यांचा इथे उल्लेख केलेला नाही. मात्र त्या गीतातही सामाजिक वास्तव बघायला मिळत . जी गाणी स्त्री, पुरुष, मुल एकत्र बसून ऐकत, हसत, बक्षीस देत.

**असा कलावंत, स्वाभिमानाने जगाला मी कुणालाच घाबरत नाही कुणाच्याही खोट्या स्तुतीची गाणी मी गात लिहितं नाही. मी बुध्द भीमाचा पाईक आहे, असं एकदा ते स्टेजवर कुणीतरी आमच्या पदाधिकारी यांचं गीत गा म्हटल्यावर असं जाहीर बोलले होते. असे चांगले कलावंत त्यांची लेखणी लोकांच्या स्मरणात राहतात. म्हणून मी ही त्यांचं आवर्जुन स्मरण ठेवून हा लेख लिहिला आहे,त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !**

## जीवन सुंदर आहे!

**(पान ४ वरून)**

आहेत हे मात्र जाणू शकत नाही. याचाच अर्थ जे बीज आपण पेरतो, त्यातून जी फळे मिळतील ती कित्येक पटीने वाढून मिळतील. कारण निसर्गनियम सांगतो, प्रत्येक बीजापासून असंख्य फळे मिळतात. मग ते बीज चांगुलपणाचे असो वा वाईटपणाचे... अंत:करणातील विचारांना योग्य दिशा देवून बीजाप्रमाणे त्यांची पेरणी केली की, हेच विचार कित्येक पटीने वाढून जीवनात आनंदाची हिरवळ निर्माण करता येते.. अशा हिरवळीवरुन चालताना कधी, कुठे आणि कोणाबरोबर आपले ऋणानुबंध जुळून येतील हे सांगता येत नाही. ऋणानुबंध हा हृदयाचा असा दरवाजा आहे, तो कोणालाही सहजासहजी उघडता येत नाही. आणि त्या दरवाजाने प्रवेश केलेली माणसं सहजासहजी बाहेरही जाऊ शकत नाहीत. ऋणानुबंधाची नाती ही फूल आणि सुगंधासारखी असतात.. जी परस्परांपासून कधीच दूर होऊ शकत नाहीत. अशा नात्यातली माणसं लवकर भेटली नाहीत तर, भेटीची आतुरता वाढते.. त्यांच्या वाटेकडे डोळे लागून राहतात.. जीव कासावीस होतो..

प्रत्येक मानवी जीवाच्या दोन इच्छा असतात. एक मला सार्वभौमपद मिळावे. म्हणजे राजा होण्याची इच्छा असते. दुसरे मृत्यू.हे सत्य असून मानवी देह तो स्वीकारायला तयार नसतो. त्याला मरण नकोसे वाटते. हे कटूसत्य असून ते न स्वीकारल्यामुळे मानवी जीवनात वाट्याला दु:ख येते...

इथे मानवी जीवनाचा अर्थ समजून घ्यावा लागतो. प्राजक्ताच्या झाडावर सायंकाळी कळ्या जन्म घेतात.. पहाटे उमलतात.. सूर्योदयापूर्वी मातीवर गळून पडतात.. गळून पडलेल्या त्या फुलांना मातीचा स्पर्श झाला की, त्यांना अधिक सुगंध येतो.. तो आसमंत भरुन उरतो.. आयुष्य थोडे असूनही कृतार्थतेची कोमल भावना सोबत घेवून दुसऱ्यांना आनंद देण्याची वृत्ती प्राजक्ताजवळ आहे. माणसाचे जीवन याहून वेगळे नाही.. बालपण, तरुणपण आणि वार्धक्य या



(पान ९ वर )

## दिवाळी आणि महागाई

कु. रेश्मा साटम
शिरगाव सिंधुदुर्ग

दिवाळी हा सगळ्यांचा जिव्हाळ्याचा सण आहे, विशेषतः कोकणात, जिथे सणाच्या प्रत्येक दिवशी वेगवेगळ्या परंपरा आणि आनंदाचे सोहळे असतात. लक्ष्मीपूजन, दिव्यांची रोषणाई, घरचा फराळ, फटाक्यांचा आवाज आणि नात्यातील प्रेम, या सगळ्या गोष्टींचे आकर्षण असते.

पण या वर्षी महागाईचा भार इतका वाढला की, या सणाचा गोडवा थोडा फिका झाला आहे. जेव्हा आपण फराळाचे पदार्थ घरी बनवतो, त्या साहित्याचे दर इतके वाढले आहेत की साधे बेसन, साखर, तूप यासारख्या वस्तूंच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत. वाढलेले दर पाहता अनेक कुटुंबांनी त्यांच्या खर्चाचा विचार करून काही पदार्थ कमी केले आहेत, तर काहींनी बाजारातून तयार फराळ विकत घेण्याचे ठरवले आहे. हल्लीच्या काळात महागाईमुळे लोकांनी सणाचा आनंद साधेपणाने साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे.

फटाके हा दिवाळीतील महत्त्वाचा भाग आहे. लहान मुलांसाठी हा फटाक्यांचा सण असतो, पण फटाक्यांचे दर आणि इंधनाचे भाव इतके वाढले आहेत की, घराच्या बजेटवर त्याचा परिणाम जाणवतोय. हे सगळं पाहता, लहान मुलांना फारसे फटाके घेऊन दिले जात नाहीत.

कोकणात नात्यातील लोक एकमेकांना भेटवस्तू देऊन दिवाळीचा उत्सव साजरा करतात. पण या वर्षी कपडे, दागिने आणि इतर भेटवस्तूंच्या किंमती इतक्या वाढल्या आहेत की, लोकांनी त्यावरील खर्च कमी करून फक्त महत्त्वाच्या गोष्टी घेण्याचा विचार केला आहे.

या महागाईच्या परिस्थितीत दिवाळी सण साधेपणाने साजरा करणे हा कोकणी लोकांसाठी एक नवा विचार दिसू लागला आहे. खर्चीक फराळ आणि मोठ्या भेटवस्तू टाळून, कुटुंब एकत्र येऊन सणाचा आनंद साधेपणाने साजरा करण्याचा प्रयत्न दिसतो आहे. दिव्यांची साधी सजावट, साधा पण स्वादिष्ट फराळ, आणि एकमेकांशी केलेले गप्पांचे क्षण हाच आनंद बनला आहे.

महागाईमुळे लोकांमध्ये एक गोष्ट जागृती झाली आहे, ती म्हणजे आपल्या परंपरेचे मूल्य आणि साधेपणाचा आनंद. कुटुंबासोबत घालवलेला वेळ, एकमेकांची साथ आणि प्रेम, हे सगळ्या खर्चांपेक्षा अधिक महत्त्वाचे वाटू लागले आहे.

**आजच्या युगात सण साजरे करताना खरं सुख खर्चात नाही तर प्रेम आणि साधेपणात आहे, हा नवा अनुभव कोकणी लोकांना या दिवाळीत मिळत आहे.**



## दीन दीन दिवाळी...

### मालवणी मुलखात



वयल्यांचा कवग्या,
मालवण- सिंधुदुर्ग.

दररोज हसत खिदळत येणारी परबीन आज सांचेक अगदी तॉन्ड पाडून आमच्या लोट्यावर येव्न बसली. बसली ती बसली, हात कपाळावर घेव्न बसली. मी म्हटलय, अगे परबीनी झाला काय? तशी परबीन बोलाक लागली, काय सांगा गावकारनी, सकाळी ह्येनी पाच हजार रुपयांचा बंडल हातात ठेवल्यानी. म्हणाले, जा गो. आज बाजारात जा. फराळाचा सामान घेव्न ये. आता दिवाळेक ऱ्हवले कितके दिस? जेमतेम चार पाच. फराळ होव्क व्हयो. मी बाय पाच हजार म्हटल्यावर मोठी पिशवी घेव्न बाजारात गेलंय. तेलाच्ये पिशवे घे, टाक बास्केटात, मैदो घे, टाक बास्केटात, असा करता करता सगळे जिन्नस घेव्न काऊंटरवर इलय. काऊंटरवर इल्यार सदीची धाकधूक, बील किती होता नि किती नाय. पण आज एक जास्तीचो कॉन्फिडंस, घोवान पाच हजार रुपये दिल्यानहत!

बील बनता बनता मी आपला एकेक जिन्नस घेतय, पिशवेत टाकतय. सगळे जिन्नस पिशवेत भरून झाले. बील काढ म्हटल्यावर सुरसुर आवाज करीत बील मशीनमधून भायर पडला. अगे बाय, बीलाचो आकडो बघतय तर, नव हजार पाचशे सतरा! आता गे बाय!! माझ्या गाठीक पाच हजार रुपडे नि बील इतक्या! फीट येवची पाळी इली ना गे माका. सगळो बाजार गोल गोल फिराक लागलो. अंगातना घाम उतारलो. आता बील तर करून झाला, जिन्नस पिशवेत भरून झाले. आता जिन्नस भायर काढूचे म्हणजे लाज नाय काय गे? मी काऊंटरवरच्या चेडवाक म्हटलय, वायच थांब हा, ह्ये येतत पैशे घेव्न. मी ह्येंका फोन लावलय, आणखी पाचेक हजार घेव्न येवा.

नशीब गे बाय, आमचे ह्ये जवळपास व्हते. मी फोन केल्यावर फक्त म्हणाले, अगो, इतक्या घेतलस तरी काय? तू घराक चल, तुका दाखवतय, बाजार कसो करतत तो. आता ह्येंच्याफुडे बोलाचा कोणाचा शाणपाण आसा काय? मी आपला गप्प. बोलतलस काय फुडे? आधी बील तर पेड व्हवक व्हया ना? पाचच मिनिटात ह्ये इले. काऊंटरवर लक्ष टाकीत माझ्याकडे एक जळजळीत कटाक्ष टाकल्यानी. खिशातना पाच हजार रुपये भायर काढल्यानी. माझ्याकडे देयत म्हणाले, बील पेड कर. उरलल्याचा चिकन घेव्न जा. रिक्षा करून जा. येतय मी थोड्या वेळात. मी बाय आपला गप्प. काय बोलाक नाय.



महिन्याभरापुर्वी शंभर रुपये असलेली तेल पिशवी आता चक्क दीडशे रुपये? लसूण चारशे रुपये? डाळी दीडशेच्या वर? तूप, डालडा तर विचारूची सोय नाय! कांदे शंभराच्या घरात, कडधान्यांनी शंभरी ओलांडलेली.... सामान्य माणसान जगाचा तरी कसा? जगाचा की विष खावन मराचा? आपण आपला ह्या फुकट मिळता, ता फुकट मिळता म्हणान खुश व्हतव. खात्यार चार पैशे जमा झाले तर किती आभाळात जातव. पण ह्या काय, म्हागाय खय जावन पोचलीहा त्येचो कधी विचार केलव? काल ह्ये सांगा व्हते, शंभर रुपयाचो बॉण्ड पेपर आता पाचशेवर गेलो. सामान्य, गरीब माणसान जगायचा तरी कसा? इतकी म्हागाय वाढात ह्या कोणी सपनात तरी बघलल्यान काय गे गावकारनी? आता माका चिंता पडलीहा, ह्ये सांचेक घरात येवन हुदुदो करतले. नाय नाय ता बोलतले. एकदा ह्येंचा तॉण्ड सुरु झाला तर मगे बाय माका घरात ऱ्हवाक नको. आता तर माका वाटता, घरातच जाव नये. गावकारनी, आता तूच सांग, मी काय करु? परबीनीची गजाल ऐकून मी पण बाय कपाळावर हात घेतलय. आता मी तरी काय सांगा ओ परबीनीक?



# काजू कतली



स्वाती पाटील
पलूस ,सांगली

**काजू कतलीही एक मिठाई आहे, जी प्रामुख्याने सणांमध्ये, बनवली जाते. चला, त्याची रेसिपी पाहूया:**

**साहित्य:**

- **काजू: १ कप (बारीक वाटून पावडर करा)**
- **साखर: १/२ कप**
- **पाणी: १/४ कप**
- **वेलची पूड: १/४ टीस्पून (ऐच्छिक)**
- **तुप: १ टीस्पून (कणीक सोडण्यासाठी)**
- **सिल्वर वर्क: सजावटीसाठी (ऐच्छिक)**
-

**कृती:**

1. **काजू पावडर तयार करणे:**
   - काजू स्वच्छ काढून घ्या आणि त्यातील ओलसरपणा पूर्णपणे गेला आहे याची खात्री करा.
   - मिक्सरमध्ये काजू बारिक करून त्याची पावडर करा. लक्षात ठेवा की, काजू थंड असताना बारीक करावेत, अन्यथा काजूचे तेल सुटून पेस्ट होण्याची शक्यता असते.

1. **साखरेचा पाक तयार करणे:**
   - एका कढईत अर्धा कप साखर आणि १/४ कप पाणी टाका. मध्यम आचेवर साखर पूर्ण वितळून १ तार पाक तयार होईपर्यंत उकळा.
   - पाकाच्या एका थेंबाला बोटाने धरून एक तार येतेय का ते तपासून बघा.

1. **काजू मिश्रण:**
   - एक तार पाक तयार झाल्यावर त्यात काजू पावडर हळूहळू घाला व मिश्रण सतत हलवत राहा.
   - मंद आचेवर ५-७ मिनिटे मिश्रण घट्ट होईपर्यंत शिजवा. हे मिश्रण पातळ चिकट झालं तर अजून काही वेळ शिजवावे, परंतु जास्त शिजवू नये.

1. **मिश्रणाचा गोळा बनवणे:**
   - मिश्रणात १ टीस्पून तूप घालून नीट मिक्स करून घ्या. गोळा बनण्यासारखे घट्ट झाले की मिश्रण गॅसवरून उतरवा.
   - मिश्रण थोडं गार झाल्यावर हाताला तुप लावून त्याचा गोळा करा.

1. **काजू कतलीला आकार देणे:**
   - एका चिकटपट्टीवर (बटर पेपर किंवा प्लास्टिक पेपर) थोडं तूप लावून त्यावर मिश्रणाचा गोळा ठेवा आणि त्यावर एक दुसरा चिकटपट्टी ठेऊन हलक्या हाताने लाटून घ्या.
   - साधारण १/४ सें.मी. जाडीची लाटून घेतली की वरचं चिकटपट्टी काढा आणि थोडं गार झाल्यावर हव्या त्या आकारात तुकडे करा.
2. **सजावट:**
   - **ऐच्छिक असल्यास वर सिल्वर वर्क लावा.**
   -

**खास सण-समारंभासाठी उत्कृष्ट आपली स्वादिष्ट काजू कतली तयार!**

## ७. ले आऊट/भूखंड एकत्रीकरण/विभाजन आणि त्यांचे नकाशे

**(पान ३ वरून )**

अनेक वेळा प्लॉट्सचे एकत्रीकरण करून मग उपविभाजन केले जाते. अर्थात ही बाब बिल्डिंग प्लॅनच्या सोईकरिता अथवा बांधकामाच्या सोयीकरिता केली जात असते. त्यात गैर काही नाही. तसेच काही वेळा शेजारीशेजारील प्लॉट्स मालकामध्ये प्लॉटच्या काही हिश्श्याबाबत खरेदी-विक्री व्यवहार होत असतात. अशा वेळी ७/१२ उतारे मालकांनी धारण केलेल्या क्षेत्रांनुसार वेगवेगळे करणे योग्य असते. अशावेळी संबंधित मालकाने किंवा मालकांनी स्थानिक स्वराज्य संस्थेकडे एकत्रीकरण अथवा उपविभाजनाचा ले-आऊट प्लॅन सादर करून तो मंजूर करून घेणे आवश्यक असते. एकदा स्थानिक स्वराज्य संस्थेने तो प्लॅन मंजूर केला की मग संबंधित कागदपत्रे तलाठ्याकडे देऊन ७/१२ उतारे एकत्रित किंवा उपविभाजीत केले जातात.

समजा दोन मित्रांचे म्हणजे श्री. ठाकरे आणि श्री. पवार यांचे भूखंड शेजारी शेजारी आहेत. त्यांचे नंबर एक व दोन असे आहेत. पैकी एका मित्राला ५० चौ. मी. जास्त क्षेत्र हवे आहे. त्यांनी दुसऱ्या मित्राला विचारले असता त्याने त्याच्या दोनशे चौ. मी. पैकी ५० चौ. मी क्षेत्र आपल्या मित्राला विकावयास तो तयार झाला. आता दोघांना आधी प्लॉट्स एकत्र करावे लागतील. त्यासाठी त्यांनी महानगरपालिकेच्या नगर रचना विभागाकडे ले-आऊट प्लॅन नकाशासह दाखल केला. पहिल्या टप्प्यात दोन्ही प्लॉट्स एकत्र करून प्लॉट नंबर १+२ हा जन्माला आला. त्याचे क्षेत्र एकूण ४०० चौ. मी. झाले. आता दुसऱ्या टप्प्यात त्याचे उपविभाजन करण्यात आले. आता एक प्लॉट ज्याचे क्षेत्र २५० चौ.मी. आहे हा आणि दुसरा एक प्लॉट ज्याचे क्षेत्र १५० चौ.मी आहे असे दोन प्लॉट तयार झाले. त्यांना १+२/अ व १+२/ब असे नंबर देण्यात आले. १+२/अ हा २५० चौ.मी.चा तुकडा ठाकरेंच्या नावावर तर १+२/ब हा १५० चौ.मी.चा तुकडा पवारांच्या नावावर दिसू लागला. हे झाले नगररचना विभागाचे रेकॉर्ड. अद्याप ७/१२ उतारे मात्र प्लॉट नंबर १ व २ प्रत्येकी २०० चौ. मी. चेच होते. त्यासाठी मग ठाकरे व पवार यांनी अर्ज करून प्लॉट नंबर १+२/अ हा २५० चौ. मी. चा व प्लॉट नंबर १+२/ब हा १५० चौ. मी. चा असे दोन स्वतंत्र ७/१२ तयार करून घेतल्यावर ते दोन प्लॉट्स कायदेशीररित्या अस्तित्वात येतात. थोडक्यात या ठिकाणी लक्षात ठेवण्याची गोष्ट म्हणजे फायनल प्लॉटींगची ऑर्डर झाल्यावरच सदर प्लॉट खरेदी करणे इष्ट ठरेल. (या ठिकाणी लिहिलेली नावे ही प्रतिकात्मक आहेत हे लक्षात ठेवावे.)

यावरून आपणाला एखादी जमीन विकसित करताना कोणती पद्धत अवलंबवावी लागते याची माहिती मिळेल. एखाद्या जमिनीवर घर किंवा इमारत बांधावयाची असेल तर ज्या जमिनीवर ते घर अथवा इमारत बांधायची असेल ती जमीन प्रथम अकृषिक करून घ्यावी लागते. प्रचलित शब्दात सांगायचे झाले तर सदर जमीन एन. ए. करून घ्यावी लागते.

बिनशेती वापराची परवानगी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अथवा अधिकार प्रत्यांतरीत केलेले असल्यास प्रांत अधिकाऱ्याकडून मिळते. ही बिनशेती परवानगी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४४ खाली देण्यात येते. तसेच कोणी जर बेकायदा बिनशेती वापर सुरू केला असल्यास असा वापर उपरोक्त कायद्याच्या कलम ४५ खाली काही अटी व शर्तींना आधीन राहून नियमित करून घेता येतो. त्यासाठी आकारलेला दंड भरून बिनशेती वापर नियमित करून घेता येतो

त्यानंतर जमिनीचे विभाजन करून प्लॉट्स पाडून ते विविध ग्राहकांना विकावयाचे असल्यास त्यामध्ये ले-आऊट प्लॅन बनवून घ्यावा लागतो. सामान्यपणे हे काम आर्किटेक्ट्स करून देत असतात. हा ले- आऊट प्लॅन स्थानिक स्वराज्य संस्थेकडून मंजूर करून घ्यावा लागतो. मोठ्या शहरांमध्ये महानगरपालिकेने मंजूर केलेले प्लॅन जास्त प्रमाणात बघावयास मिळतात. ले-आऊट प्लॅन दोन टप्प्यातून पास होत असतो. कच्चा आणि अंतिम. इंग्रजीमध्ये त्यास टेन्टेटिव्ह ले-आऊट आणि फायनल ले-आऊट असे म्हटले जाते. दोन्ही ले-आऊट पास होण्याचे वेळी त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थेने किंवा महानगरपालिकेने अटी व शर्ती घालून दिलेल्या असतात. त्या अटी व शर्तीचे पालन करणे अत्यंत महत्त्वाचे असते. विशेषतः टेन्टेटिव्ह ले-आऊट मधील प्लॉट्स हस्तांतरीत करता येत नाहीत व तलाठी देखील अशा ले-आऊटमधील प्लॉट्सचे उतारे स्वतंत्र करून ठेवत नाहीत. कायद्याने ते मंजूर नाही. ले-आऊट फायनल मंजूर झाल्यानंतरच तलाठी ७/१२ उतारे प्लॉटनुसार स्वतंत्र करून ठेवतो. जोपर्यंत ७/१२ उतारे स्वतंत्र होत नाहीत तोवर कच्च्या ले-आऊटमधील प्लॉट्स विकत घेताना अत्यंत खबरदारी घ्यावी. कारण तुम्ही जो प्लॉट पसंत कराल तो फायनल ले-आऊट मंजूर होताना अस्तित्वात राहीलच असे नाही. कारण कच्च्या ले-आऊटचे फायनल ले-आऊटमध्ये रुपांतरण होत असताना काही प्लॉट्स रद्द करावे लागतात. काही प्लॉट्सची क्षेत्रफळे वाढवावी लागतात, तर काही प्लॉट्स हे दुर्बल घटकांसाठी राखून ठेवावे लागतात. त्यामुळे त्यांचे क्षेत्रफळ कमी ठेवलेले असते. थोडक्यात म्हणजे ले आऊटला अंतिम परवानगी मिळतेवेळी प्लॉटनुसार ७/१२ झाले आहेत की नाही ते पाहून घ्यावे

## जीवन सुंदर आहे!

**पान ७ वरून )**

तीन अवस्थांमधून जाताना माणसाला त्या त्या परिस्थितीशी जुळवून घ्यावे लागते. तिन्हीपैकी कोणतीच अवस्था चिरकाल टिकणारी नाही. फुलाप्रमाणे एक दिवस माणसालाही असेच गळून पडावे लागते.. गळून पडणाऱ्या फुलांचे जसे गाणे होते, तसे माणसाच्याही गळून पडण्याचे गाणे व्हावे अशी एक अतिव भावना माणसाच्या हृदयात निर्माण व्हावयास हवी.. इतरांविषयी . आपल्यात आणि आपल्याविषयी इतरांत चांगुलपणा निर्माण करता आला पाहिजे. चांगुलपणा, माणुसकी, आपुलकी, स्नेह, प्रेम, कृतज्ञता, कृतार्थता या गोष्टी विकत घ्याव्या लागत नाहीत. सागराच्या तळाशी असलेल्या शिंपल्यातील मोत्याप्रमाणे त्या आपल्या हृदयाच्या तळाशी हृदयाच्या तळाशी असतातच. त्यांचा शोध घ्यावा लागतो. त्यासाठी तळाशी खोलवर जाण्याची तयारी असावी लागते. धैर्य असले की, शोध लागतो. शोध लागला की, ध्येयाची फलश्रुती हाती येते. हे जगण्याचे सूत्र माणसाला शोधता आले पाहिजे.

आपले शरीर नश्वर आहे त्यामुळे सौंदर्याचा कधीही अहंकार न करता आहे त्या रंग, रूपावर प्रेम करायला शिकले पाहिजे. माझे मीपण गळून गेले तरच जगणे सुंदर होईल. जीवन क्षणभंगुर आहे. त्यामुळे आनंदी रहा. आणि प्रत्येकाला आपले समजा. प्राणिमात्रांवर प्रेम करा. जीवनाचे वेगवेगळे पदर उलगडताना आई - वडील, बहीण भाऊ, पती- पत्नी, मुले, नातेवाईक, मित्र-मैत्रिणी तसेच रक्तापल्याड जपलेल्या नात्यांना वेळ द्या.. यातूनच आपले जीवन सुंदर होईल...

# काव्यांगण

## ज्याची त्याची दिवाळी!

शेतामधले माणिकमोती
पाहि सुखाने उघड्या डोळीं
बळिराजांची झोळी भरता
त्यांच्यासाठी तीच दिवाळी

रोज राबती त्या घरकामीं
खस्ता खातीं सांज सकाळी
आरामाचा दिवस एकला
त्यांच्यासाठी तीच दिवाळी

जीर्णे कसले दारिद्र्याचे
घरही ज्यांचे चंद्रमौळी
आधाराची छाया मिळता
त्यांच्यासाठी तीच दिवाळी

रोजच नारी रडते आहे
सुरक्षीत ना पोरी बाळीं
येई धावुन कृष्ण सत्वरीं
त्यांच्यासाठी तीच दिवाळी

जर्जर झाले राब राबुनी
गात्रें थकली नातीं तुटली
पुत्र येउनी कवळीं हृदयीं
त्यांच्यासाठी तीच दिवाळी

**बाबू घाडीगांवकर**

## चाहूल दिवाळीची..

संसारातील भांडीकुंडी सर्व केली लख्ख
कोण ती घाई माझ्या घरातील सुगरणीला
अन्नपूर्णा तर ती नित्याचीच आहे
पण अजूनच जास्त झिजते ती फराळासाठी!!१!!

धनत्रयोदशी लक्ष्मीपूजन पहिली अंघोळ काय
थाट उडवला साऱ्यांचाच कुठेच उणे नाही
नवीन वसने आभुषणे फराळ छान
लक्ष्मीनारायणाचा जोडा पहा कसा दिसतो उठून !!२!!

घर असे केले लख्ख नि पावन
स्वर्गच अवतरला जणू या भूवर
उभारले ते विश्व प्रेम आपुलकीचे
रमले मोहोरले तनमन दिपांच्या प्रकाशाने!!३!!

अंगणी रांगोळी शोभतसे आकाशकंदील
धूप दीप रोषणाई ती अद्भुत
खरंच मनाला लागली दिवाळीची चाहूल!!४!!

**सुखदा सयाजीराव गोरड.**



## 'दिवाळी "

आली,आली...!
लखलखत्या चंदेरी तेजाची,
दिवाळी ही आली....!
आकाश कंदिल,पणत्या
विद्युत रोषणाईनी ,
सारी घरे चमचमली...!
सारी चराचरी सृष्टी,
ही आज....
आनंदाने नाचू लागली...!!


उदासीनतेचा अंधार,
घालवणारी.....!
घराघरांत समृद्धी ,
आणणारी.....!
प्रत्येकाला नवचैतन्य,
देणारी......!
आली, आली...!
लखलखत्या चंदेरी तेजाची,
दिवाळी ही आली .....!!

अज्ञानी लोकांच्या जीवनी,
ज्ञान दीप उजळवणारी...!
अविवेकाच्या काजळ्या,
नाहीशा करणारी.....!
आली, आली......!
लखलखत्या चंदेरी तेजाची,
दिवाळी ही आली....!!

ज्ञानेश्वर माऊली म्हणे....!
लोकांच्या जीवनी,
निरंतर यावी ही दिवाळी,
सुखाचा हा सोहळा,
व्हावा घरोघरी.....!
भिजुनी जावे त्यात सारे...
चिंब, चिंब, आनंदापरि....!!
आली, आली....!
लखलखत्या चंदेरी तेजाची,
दिवाळी ही आली.....!!

**प्रा.के.एस.शिरबंदे,**
**दापोली.**
**(मो. 9423818161)**

.................................................



## घरभर भरलेले

काका काकू ताई आत्या घरभर भरलेले
सुंदर होते कुटुंब तेव्हा झाड बहरलेले

आई, काकू रोज राबती शेत शिवारावरी
बाबा, काका मोट धरूनी, धावे बाजारी

अंतू चिंतू इंदू मालू भेदभाव हा नसे
समजत नव्हते आई बाबा, कोण कुणाचे असे

सतत पाळणा हलता राही काकू, आत्या, माई
वर्षा वर्षाकाठी फळती बाळंतीणी बाई

रांग मुलांची पाठोपाठी कुणी रडे तर मुते
भूक लागता समजत नव्हते कोण कुणाचे पिते

मोठी म्हणुनी ताई बघते छोट्या शामूला
मस्ती करूनी बंडू पळतो, मार अंतूला

जरी गरीबी होती पण श्रीमंती नात्याची
आज विसरतो आपण ओळख भावाभावाची

□□□
**© विजो**
**डोंबिवली (मालवण - सिंधुदुर्ग)**



## दिपावली

अश्विनमासाचे पडता पाऊल
दिपावलीची लागते चाहूल
केराबरोबर फेकलं मनातील तण
आप्तेष्टांना धाडलं कि आवतण

घरादाराची केली साफसफाई
स्नान करून शुभ्र म्हशी गाई
सासरहून येती नणदा, पोटच्या मुली
सोबत येती जावई नातवंडे चिमुकली

घरात आनंदाला येतो महापूर
चिमण्यांच्या मनात फटाक्यांची हूरहूर
सात दिनांचा असे हा महोत्सव
वसूबारशाने होते सुरवात
होई बहिणीच्या तीजेने समाप्त

दररोज आगळेवेगळे कारण
गोधन संपत्ती लक्ष्मीचे पूजन
कृष्णाने केले नरकासूराचे दमन
विजयी रामाचे पुनरागमन

बंधू भगिनींच्या प्रेमाला येई उधाण
घरोघरी संतोष संभ्रमाचे तूफान
दिननित्य पंचपक्वान्न आणि फराळ
अंगणात सजते पणत्यांची माळ

रंगबिरंगी रांगोळीची किती ही शोभा
नवीन वस्त्राभरणात नूतन आभा
खेळीमेळीचे दिवस जाती पळून
पुन्हा लागती कामा पदर बांधून

**प्रेमा मेणशी**
**बेळगावी**
**कर्नाटक**





# बालजगत





**लाडक्या पावसाशी एक अनोखे नातं असलेल्या मुलांच्या मनात यावर्षी पाऊस परत जात नाहीय त्यामुळे खूप चलबिचल झाली आहे. आपल्या भावना त्यांनी लिहून व्यक्त केल्या आहेत .......**

## पावसा पावसा निघून जा....

पावसात तुझी मी खूप आतुरतेने वाट बघत होते. कारण, मला पावसात भिजायचे होते. अंगणात साचलेल्या पाण्यात उड्या मारायच्या होत्या, तसेच हिरवीगार शेती झालेली, झाडे पाण्याने भरलेल्या नद्या ही सर्व मी खूप आनंदाने पाहिले. पण आता ऑक्टोबर महिना संपत आला तरी तू जायचं नावच घेत नाहीस

दसऱ्यामध्ये सुद्धा तू खूप लागलास त्यामुळे आम्हाला दांडिया सुद्धा नाचता आला नाही. ते जाऊ दे पण सततच्या पावसामुळे कापणीच्या आलेल्या शेतीचे खूप नुकसान झाले.

शेतकऱ्याला काही सुचेना असे झाले आहे. काही ठिकाणी तर वीज पडून जीवित हानी सुद्धा झाली तसेच गुराढोरांवर सुद्धा वीज पडली. गाड्यांच्या वाहतुकीत सुद्धा अडचणी आल्या आम्हाला शाळेतल्या मुलांना शाळेत जाण्यासाठी बस येत नाहीत. अनेक आजार सुरू झाले जसे ताप, सर्दी, खोकला म्हणून तरीपण पाऊस सुरूच पावसाला कंटाळलो नाही तर

**लोक सुद्धा आता म्हणतात की**
**जा रे जा रे पावसा तुला देतो पैसा.....**
**पैसा देतो खरा पण जा तू आता जरा,**
**अंगणात टिकू दे रांगोळी,**
**करू आम्ही साफसफाई,**
**दिव्यांची रोषणाई ,**
**म्हणून म्हणते मी पावसा पावसा निघून जा.**



**कु. वेदिका मुलूख,**
**इयत्ता- आठवी.**

## पावसा पावसा निघून जा!

जून पासून सुरू झालेला पाऊस आजपर्यंत लागत आहे. पावसा आता तरी तुझा आम्हाला कंटाळा आला आहे. या वर्षातला हा असा पावसाळा आहे की तो संपायलाच मागत नाही. आता सर्वांचे पिक आलाय आणि पावसाळा शेतकऱ्यांच्या लावलेल्या पिकांवर तो नासाडी करत आहे.

'अरे, पावसा बिचाऱ्या शेतकऱ्यांनी लावलेल्या पिकांवर का पडतो? अरे आता सर्व शेतकरी पिके कापायला लागलीत तरी तू पडतो आहेस. ही अपेक्षा तुझाकडून नव्हती. तू सर्वांच्या मनातून निसटलास आहेस. तरी तू का पडतो आहेस.? अशा वागण्याने सर्व जण कंटाळली आहेत. आधी जेव्हा पाहिजे तेव्हा तू लागायचा नाहीस आणि आता लागतोस. नदीचं पाणी आटायला येत आणि तू नदीचं पाणी आजून वाढवतोस. आता आम्ही डबके उपसायला गेलो असतो. आता तू अजुन पाणी वाढवतो. सगळी माणस आता तुझ्या या वागण्याने कंटाळलेली आहेत.

आता सोहमसारखी पोरही कंटाळली आहेत. पहिली खूप खूष झाली. पण आता कंटाळली. आमचे सर बोलतात की अरे पावसा, जा रे लवकर जा रे लवकर जा. हिवाळा येतोय रे. आता सर्व पिके कुजून गेली आहेत. आम्ही मित्र मित्र कुठे फिरायला गेलो की तू जोराचा लागतोस. पावसा पावसा निघून जा, पावसा पावसा निघून जा.



कु. विराज राजेंद्र मुलुख,
इयत्ता- ७वी.



## पावसा, पावसा, माघारी जा!

पावसा, आता थांब जरा,
तुझ्या सरींचा झाला खेळ पुरा,
घरभर ओलीचिंब झाले माती,
जरा विश्रांती घे आता घनराती।

तुझ्या बरसण्याने भरल्या ओढ्या,
तृप्त झाली सगळी, झाड-वेली,
धरणंही भरली, शेतंही सुखावली,
आता माघारी जा, पाहिजे उन्हाची लाली।

आभाळ कोरडे राहू दे आता,
घराबाहेर पडू दे पोरांना,
तुझ्या येण्याने आनंद झाला खरा,
पण आता थांब जरा, थांब जरा।

झाले ओले कपडे, कपाटात ठेवू दे,
तुझी रिमझिम आठवणीत ठेवू दे,
पावसा, परत ये पुन्हा नव्या सरींनी,
पण आता थोडं थांब जरा, उन्हाची ओढ वाढू दे जरा।

**ग्रंथाली गुरुदास सातारकर**
**IMCOM 2nd year GOA**



## पावसा, पावसा, परत जा!

आज ऑक्टोबर महिना संपायला आला तरी खुप जोरात पाऊस पडतोय. खर तर पाऊस सप्टेंबर महिन्यातच संपायला हवा होता. आता आम्हाला पाऊसाचा खुपच कंटाळा येतो. कारण जेव्हा पाऊस चालू होतो तेव्हा आपण खुप खुष होतो आणि जर रोज पाऊस पडला तर आपल्याला पावसाचा खुप राग येतो.

शेतकरी लोकांनी लावलेले पिके आता कुजायला आली तरी पाऊस पडतोय. म्हणून त्यांनी लावलेली पिके कुजून जातात.या वेळी हा पावसाळा कमी व्हायला मागत नाही. गेल्यावर्षी पाऊस सप्टेंबर महिन्यातच निघून गेला होता . अरे, पाऊसा तु आता निघून जा. आम्हाला तुझा खुप कंटाळा येतो.

सकाळी शाळेत जाताना पण पाऊस शाळेतुन घरी येताना पण पाऊस आम्ही या पावसातुन पुर्ण भिजुन जातो. तुझ्यामुळे आम्हाला ताप,सर्दी होते. जेव्हा आम्ही म्हणतो पाऊसा ये तेव्हा तु येत नाही आणि आता जोरात येतोस.

तुझ्यामुळे अनेक शेतकरी दुःखी झाले. त्यांची पिके व लावलेली भाज्यांची झाडे आता खराब होऊन गेली. त्यांचे खूप नुकसान झाले. जेव्हा तु खुप जोरात पडतोस तेव्हा लहान लहान मुले म्हणतात पाऊसा पाऊसा निघून जा. जेव्हा मी आणि माझे मित्र कोठे फिरायला जात असतो तेव्हा तु खूप जोरात पडतोस .आम्हाला तुझा खुप राग येतो.



**कु. प्रसाद नरेश शिगवण,**
**इयत्ता- सातवी.**

## पावसा, पावसा, परत जा!

आता ऑक्टोबर महिना चालू झाला तरी अजून पाऊस संपायचा नावच घेत नाही. अजून पाऊस जोरात पडत आहे. पहिल्यांदा पाऊस जोरात पडतो तेव्हा आपल्याला खूप मजा येते. शेवटी पाऊस खूप पडत असेल तर आपल्याला खूप कंटाळा येतो. कारण जर पाऊस थांबलाच नाही तर शेतकरी आपल्या शेतात आलेलं पीक कापू शकत नाही. त्यांची शेती कुजून चालली आहे.

शेतकरी तुझ्यावर खूप चिडले आहेत. कारण त्यांच्या शेतात जे जोमान आलेल्या पीक तू खराब करत आहेस. नदीचं पाणी आटायला आलं तरी तू अजून पडतोस ही अपेक्षा तुझ्याकडून नव्हती. मात्र आता सोहम सारखी मुले तुझ्यावर खूप चिडली आहेत कारण तू जायचं नावच घेत नाही. कुठे फिरायला जायचे असेल तर पावसा तू खूप पडतोस. त्यामुळे आम्हाला फिरायला जायला मिळत नाही. म्हणून आम्ही तुझ्यावर खूप दुःखी आहोत आत्ता तरी जा पावसा!



**कु. अथर्व सुनील रांगले,**
**इयत्ता- सातवी**